रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २९५
www.ramprahar.com

सोमवार, १३ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंधारेंचा व्हिडीओ लावत राज यांची उद्धव ठाकरेंवर टीका



**ठाणे :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत उद्धव ठाकरे यांच्यावर जहरी टीका केली आहे. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांचा व्हिडीओ दाखवत राज यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. वडील चोरले म्हणता, मग बाळासाहेबांवर टीका करणाऱ्या या बाईला पक्षाचे प्रवक्ते कसे केले, असा सवाल त्यांनी रविवारी (दि. १२) सभेत केला. महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के आणि श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ सभा झाली. तेव्हा ते बोलत होते. सुषमा अंधारे यांचे अनेक व्हिडीओ आहेत. मला त्यांच्याशी देणं-घेणं नाही, पण माननीय बाळासाहेबांबाबत वक्तव्य करणाऱ्या या बाई, म्हाताऱ्याच्या हातामध्ये तलवार दिल्यावर लढणारा हा हात असे बोलतात. त्या व्यक्तीला तुम्ही तुमच्या पक्षाचे प्रवक्ते करता आणि तुम्ही तुमच्या वडिलांवर प्रेम आहे म्हणून सांगता, अशी टीका राज यांनी केली.


### अंतरंग

- आज चौथ्या टप्प्यातील मतदान; प्रशासन सज्ज/३
- पोलादपूरमध्ये 'अवकाळी'ने शेतकऱ्यांचे नुकसान/५
- दक्ष फायटर संघ ठरला एमपीएलचा मानकरी/८





# ...म्हणून राज ठाकरे भाजपसोबत

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच राज्यात महायुती व महाविकास आघाडीच्या जागावाटपाची चर्चा रंगली होती. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यामुळे राज ठाकरे काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यानुसार मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरेंनी भूमिका जाहीर करीत, पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी मनसेचा भाजपला बिनशर्त पाठिंबा असल्याचे म्हटले. मनसेच्या पाठिंब्याचे राज्यातील महायुतीकडून स्वागत करण्यात आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही राज ठाकरेंचे आभार मानले. त्यानंतर, आता पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राज ठाकरेंसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना राज ठाकरेंना सोबत घेण्याचे कारण सांगितले.





महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झाल्यानंतर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेसोबत भाजपने सरकार स्थापन केले. त्यानंतर अजित पवारांच्या नेतृत्त्वात राष्ट्रवादी काँग्रेसलाही सोबत घेऊन सत्तेत स्थान दिले. त्यातच, मनसेनेही राज यांना पाठिंबा घोषित केल्यामुळे मनसेही भाजपासोबतच आली आहे. याच अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रश्न विचारण्यात आला होता.

लोकांच्या मनात प्रश्न आहे की, भाजपला विजयाची एवढी खात्री होती तरी त्यांनी राज ठाकरे यांना सोबत का घेतले?, असा प्रश्न एका मुलाखतीमध्ये नरेंद्र मोदींना विचारण्यात आला होता. त्यावर, उत्तर देताना राज ठाकरे आम्हाला नवीन नाहीत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले. मी आधी सांगितल्याप्रमाणे देशाला जो सर्वोच्च प्राधान्य देतो, त्याचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. गेल्या १० वर्षांपासून आम्ही स्वबळावर बहुमतात आहोत, मात्र तरीही आम्ही कायमच नव्या मित्रांचे स्वागत केले आहे. आपल्या लोकशाहीसाठी हे चांगले आहे. अधिकाधिक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन लोकांच्या कल्याणासाठी काम करणे केव्हाही चांगलेच असते, असे मोदींनी म्हटले.

### लोकसेवेसाठी आम्ही सगळे एकत्र

**राज ठाकरे आमच्यासाठी नवीन नाहीत, त्यांनी यापूर्वीही आम्हाला पाठिंबा दिला आहे. आम्ही देशासाठी चांगले काम केले आहे, यावर त्यांचा विश्वास आहे. आमच्या विचारांना तसेच आमच्या द्रुष्टेपणाला ते पाठिंबा देतात. महाराष्ट्राच्या विकासातही ते हातभार लावू शकतील, असे आम्हाला वाटते. त्यामुळे हे एकत्र येणे केवळ सत्तेसाठी किंवा राजकीय गणितांसाठी आहे, असे नाही. लोकसेवेसाठी एकत्र येणे, हा त्यामागचा उद्देश आहे. वस्तुतः देशहितासाठी जो कोणी आमच्याकडे येईल, त्या प्रत्येकाचे आम्ही सहर्ष स्वागतच करू, असे स्पष्टीकरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज ठाकरेंच्या पाठिंब्याबाबत दिले.**

# उद्धव ठाकरे, इंडिया आघाडी मुस्लिम लीगचीच भाषा बोलताहेत

## भाजप आमदार नितेश राणे यांचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे, इंडिया आघाडी सध्या मुस्लिम लीगचीच भाषा बोलत असून उद्धव ठाकरे, इंडिया आघाडीला मत म्हणजे व्होट जिहादच्या समर्थकांना मत देण्यासारखे आहे, अशी जळजळीत टीका भारतीय जनता पक्षाचे आमदार नितेश राणे यांनी रविवारी (दि. १२) केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार राणे बोलत होते. भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन या वेळी उपस्थित होते.



उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीवरून ते वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे नकली पुत्र आहेत, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली टीका योग्यच आहे, असेही आमदार राणे यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे, इंडिया आघाडीच्या अन्य नेत्यांकडून वापरली जात असलेली भाषा धोक्याची घंटा आहे. कर्नाटक पॅटर्न देशभर राबवण्याचा इंडिया आघाडी, उद्धव ठाकरे यांचा डाव लपून राहिलेला नाही. उद्धव ठाकरे हे मतांच्या लालसेपोटी मुस्लिम लीगची भाषा बोलू लागले आहेत. इंडिया आघाडी आणि मविआला मत म्हणजे लव्ह जिहाद, लँड जिहादला मत देण्यासारखे आहे. सामनामधील मुलाखतीवरून आमदार राणे यांनी उद्धव ठाकरे, इंडिया आघाडी आणि मविआला धारेवर धरले. सामनाच्या मुलाखतीतील ही निवडणूक हिंदुस्तान विरूद्ध पाकिस्तान अशी आहे, या उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावरून आमदार राणे यांनी ठाकरेंवर टीकेची झोड उठवली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एनडीएचे सर्व घटक पक्ष हे राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन देशाला सुरक्षित ठेवण्याचा विश्वास जनतेला देत असतानाच दुसरीकडे धर्माच्या नावावर भाजप आणि एनडीएविरोधी फतवे निघत आहेत.

धर्माच्या आधारावर मतदान करण्याचे फतवे हे राष्ट्रभक्तांसाठी खचितच नाहीत असेही आमदार राणे यांनी नमूद केले. इंडिया आघाडी आणि मविआला मत दिले तर देशात भगवे झेंडे फडकावण्यास परवानगी मिळणार नाही, नाक्या-नाक्यांवर पाकिस्तानचे झेंडे दिसतील. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हिंदू सणांवर बंदी घातली गेली होती, मात्र ईद, मोहरमला परवानगी दिली गेली होती तसेच चित्र इंडिया आघाडीला मतदान केल्यास भारतात दिसेल, असा इशाराही आमदार राणे यांनी दिला.

संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर केलेल्या टीकेचा आमदार राणे यांनी समाचार घेतला. संजय राऊत यांनी अशी भाषा वापरणे थांबवावे; अन्यथा भाजप कार्यकर्त्यांचा संयम सुटेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# शिकार, तस्करीला आळा घालण्यासाठी कोल्हापुरात सायबर सेल कार्यरत

**सांगली : प्रतिनिधी**

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रात शिकार आणि अवैध वन्य प्राण्याच्या अवयवांचा चोरटा व्यापार रोखण्यासाठी कोल्हापूरमध्ये सायबर सेल सुरू करण्यात आला आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाप्रमाणे हा सेल कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. या सेलचे उद्‌घाटन क्षेत्र संचालक आर. एम. रामानुजम यांच्या हस्ते करण्यात आले.

याबाबत माहिती देतांना विभागीय वन अधिकारी एस. एस. पवार यांनी सांगितले, वन्यजीव व वनगुन्हे यांना आळा घालण्यासाठी संशयित आरोपी यांच्यावरील आरोप सिद्ध होण्यासाठी आवश्यक तांत्रिक माहिती या सायबर सेलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. यामुळे अवैध शिकारी व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी तसेच तपास करण्यासाठी वन विभागाकडील क्षेत्रिय कर्मचारी, अधिकारी यांना लाभ होणार आहे.

वने व वन्यजीवविषयक गुन्हे हाताळणे व आरोपीच्या विरोधात पुरावे गोळा करणे व राज्या बाहेरील आरोपींनाही पकडणे सोईचे होणार आहे. सायबर सेलच्या माध्यमातून वने व वन्यजीव गुन्ह्यामधील आरोपींना शिक्षा होण्यास मदत मिळणार असून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना त्याचा अधिकचा फायदा होऊन त्यांचे मनोबल वाढणार आहे.

# नरेश म्हस्के यांना मताधिक्क्य मिळवून देणार -नामदेव भगत

**नवी मुंबई : बातमीदार**

महायुतीने नरेश म्हस्के यांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. महायुतीतील सर्व पक्ष एकत्रितरित्या प्रचार करीत आहेत. यात राष्ट्रवादी काँग्रेसदेखील मागे राहिलेला नाही. राष्ट्रवादीचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत यांनी पदाधिकाऱ्यांची कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीत भगत यांनी मार्गदर्शन करीत महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणून पंतप्रधान मोदींचे हात बळकट करण्याचे आवाहन केले.

ठाणे लोकसभा मतदारसंघ जिंकण्यासाठी मुख्यमंत्र्यांनीसुद्धा कंबर कसली आहे, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेदेखील या मतदारसंघावर लक्ष आहे. अजित पवार यांनी दिलेल्या आदेशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडूनदेखील शहरात घरोघरी प्रचाराला सुरुवात झाली आहे.

नामदेव भगत यांनी त्या पद्धतीने पदाधिकाऱ्यांना प्रचाराचे सत्र अखून दिले आहे. लोकसभेनंतर येणाऱ्या



विधानसभा व पालिका निवडणुकांची रंगीत तालीम या निवडणुकांच्या प्रचाराद्वारे होत असल्याची माहिती या वेळी नामदेव भगत यांनी दिली.

नरेश म्हस्के हे महायुतीचे उमेदवार असून, आम्ही आमची संपूर्ण ताकद प्रचाराला लावली असल्याचे भगत म्हणाले. भगत हे स्वतः सिडको संचालक म्हणून राहिलेले आहेत, तर दुसरीकडे ते नवी मुंबईतील ज्येष्ठ नगरसेवक समजले जातात. शिक्षण संस्थांद्वारे त्यांनी नवी मुंबईत आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. ठाणे जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रित म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यासोबत आगरी कोळी समाजासाठीदेखील भगत यांचे उल्लेखनीय कार्य राहिलेले आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा पक्षाला होत असून, येत्या निवडणुकीतदेखील म्हस्के यांच्या प्रचारार्थ व त्यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी त्यांच्या राजकीय क्षमतेचा फायदा होणार आहे. त्यानुसार भगत यांनी कार्यकर्त्यांसह बैठका सत्र सुरू केले असून, परिसरात कार्यक्रम घेत प्रचारात आघाडी घेतली असून नरेश म्हस्केंना मताधिक्य मिळवून देण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पदवीसाठी ६०-४० गुणविभागणी; मुंबई विद्यापीठाचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांत यंदापासून पदवी अभ्यासक्रमांसाठी ६०-४० गुणांकन पद्धत लागू होणार आहे. पदवी स्तरावरील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व इतर सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ६०-४० या पॅटर्नप्रमाणे मूल्यांकन होणार आहे. त्यानुसार प्रत्येक सत्रातील लेखी परीक्षा ६० गुणांची (बाह्य मूल्यांकन) असेल आणि ४० गुण हे सातत्यपूर्ण मूल्यमापनासाठी (अंतर्गत मूल्यांकन) असतील.



मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ८९४ महाविद्यालयांत आतापर्यंत काही अभ्यासक्रमांचे १०० गुणांनुसार व काही अभ्यासक्रमांसाठी ७५-२५ अशी गुण विभागणी करून मूल्यांकन होत होते. आता प्रत्येक सत्र परीक्षेसाठी ६० गुण आणि अंतर्गत मूल्यांकनासाठी ४० गुण निश्चित करण्यात आले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प, गृहपाठ प्रकल्प, विविध औद्योगिक व व्यावसायिक भेटी, ऑन जॉब ट्रेनिंग, व्याख्यानांमध्ये उपस्थिती आदी गोष्टींचा अंतर्गत मूल्यांकनामध्ये समावेश असेल. ६०-४० या गुणविभागणीनुसार विद्यार्थ्यांना बाह्य मूल्यांकन आणि अंतर्गत मूल्यांकन अशा दोन्ही परीक्षांत स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल.

या मूल्यमापन पद्धतीची अंमलबजावणी करण्याचे आदेश मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत.

# खारघरमध्ये मोबाईल, रोख रकमेची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

दरवाजातून घरात प्रवेश करून अज्ञात व्यक्तीने तीस हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि पाच हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अंकित अशोक श्रीवास्तव सेक्टर १०, खारघर येथे राहतात. त्यांची घणसोली येथे कंपनी आहे. ९ मे रोजी ते आणि त्यांची पत्नी सेक्टर ३५ येथे नवीन घराचे काम चालू असल्याने ते पाहण्यासाठी गेले होते. लगेच परत येणार असल्याने जाताना त्यांनी घराला कडी लावली. ते सेक्टर १० येथील घरी परत आले त्या वेळी त्यांच्या घराचा दरवाजा उघडा होता. बेडरूममधील टेबलवर ठेवलेला मोबाईल सापडला नाही. कपाटाचा दरवाजादेखील उघडा दिसला. पत्नीच्या पर्समधील पाच हजार रुपये सापडले नाहीत. त्यामुळे त्यांनी अज्ञात चोरट्याने मोबाईल आणि रोख रकमेची चोरल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली.

# मोहोपाड्यात पर्यावरण संतुलनासाठी रोटरी ग्रीन सोसायटी प्रोजेक्टवर मार्गदर्शन




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांचा संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१२)प्रिआ स्कूल मोहोपाडा येथे रोटरी ग्रीन सोसायटी प्रोजेक्टवर मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रीन सोसायटी प्रकल्पाची पहिली पायरी म्हणून, सोसायट्यांसाठी सकाळी १० ते १ जनजागृती सत्रांचे नियोजन केले होते. सादरीकरणे आणि वन टू वन चर्चा करण्यात आली, तसेच हरित उपक्रमांतर्गत सोसायट्यांना काय करावे आणि कसे करावे याबाबत तज्ज्ञ, एनजीओ मार्गदर्शन करण्यात आले. ऊर्जा संवर्धन, पाणी, कचरा व्यवस्थापन आणि शहरी शेती या क्षेत्राबाबत चर्चा करण्यात आली. ज्या संस्थांनी यापूर्वी हरित समाज किंवा पर्यावरणासाठी उपक्रम सुरू केले आहेत त्यांचा सत्कार करण्यात आले, तसेच पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने कापडी बॅग वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी रोटरी डिस्ट्रीक गव्हर्नर मंजू फडके, डिस्ट्रीक डायरेक्टर केशव ताम्हणकर, पर्यावरण तज्ज्ञ मोना शहा, वेस्ट मॅनेजमेंट तज्ज्ञ सचिन माळेकर, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण जाधव, रोटरी क्लब पाताळगंगा अध्यक्ष रेश्मा कुरूप, बिर्ला कार्बन पाताळगंगाचे लक्ष्मण मोरे, गणेश काळे, अमित शहा, रोटरी क्लब पाताळगंगा माजी अध्यक्ष गणेश वर्तक, माजी सरपंच दीपक जाधव, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रदिप पाटील, सचिन मालकर, सुनील कुरुप, डॉ. बिना रेगे उपस्थित होते.

# राज्यात २७ ठिकाणी जनऔषधी केंद्र सुरू

## पहिल्या टप्प्यांत २९० संस्थांची झाली निवड

**पुणे : प्रतिनिधी**

विविध कार्यकारी संस्थांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्यात २७ ठिकाणी जनऔषधी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यांत राज्यातील २९० संस्थांची निवड करण्यात आली असून, २५० विविध कार्यकारी संस्थांमध्ये अशी केंद्रे सुरू करण्यास आयुष मंत्रालयाने मान्यता दिली आहे.

राज्यातील विविध कार्यकारी संस्थांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने विविध ३०० उपक्रम हाती घेतले आहेत. आजमितीला राज्यात सुमारे २० हजार विविध कार्यकारी संस्था आहेत. त्या संस्थांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने कायद्यात बदल केले आहेत. त्याबाबतची विविध कार्यकारी




सोसायट्यांना माहिती देण्यात आली आहे. पीक कर्जाशिवाय या संस्थांनी विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपक्रम राबविण्याचे केंद्र सरकारने धोरण राबविले आहे. त्याद्वारे संस्थांनी स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात राज्यात या संस्थांमधून जनऔषधी केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. मंत्रालयाने संबंधित संस्थांची कागदपत्रे तपासल्यानंतर त्यांना जनऔषधी केंद्र सुरू करण्यासाठी कोड देण्यात येतो. त्यानंतर औषधी परवाना देऊन दुकान सुरू करता येते. त्यानुसार आतापर्यंत २९० संस्थांची यासाठी निवड करण्यात आली आहे. त्यात २५० संस्थांनी नोंदणी केली असून, आयुष मंत्रालयाने १८६ संस्थांना मान्यता दिली आहे.

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तांच्या (एफडीए) निकषांनुसार या जनऔषधी केंद्रांमध्ये फार्मासिस्टची उपस्थिती बंधनकारक आहे. त्यामुळे १२३ संस्थांनी अशा फार्मासिस्टची नेमणूक केली आहे, तर औषध परवान्यासाठी १०३ संस्थांनी अर्ज केला आहे. आतापर्यंत ५० संस्थांना औषध परवाना मिळाला आहे, तर २७ ठिकाणी जनऔषधी केंद्र सुरू करण्यात आले आहे. गावातच स्वस्त व किफायतशीर दरामध्ये औषधे मिळावीत, हा यामागील उद्देश आहे, तसेच यातून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून संस्थांचे बळकटीकरणदेखील होणार आहे.

**राज्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने आपल्या नियमांमध्ये काही बदल केले आहे. त्यामुळे ३०० प्रकारचे उपक्रम या संस्थांना राबविणे शक्य आहे. त्याद्वारे संस्थांना आर्थिक उत्पन्न मिळू शकणार आहे.**

**- शैलेश कोतमिरे, प्रभारी आयुक्त, सहकार विभाग**

# कळंबोलीत जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** स्टील मार्केट ५ नंबर पार्किंग रोडच्या बाजूला ब्रिजच्या शेजारी ताज इंटरप्राईजेस शेजारील झोपडीमध्ये जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कळंबोली सर्कलच्या पुढे मुंबई एक्स्प्रेस वेच्या खाली असलेल्या ताज इंटरप्राईजेस या टायरच्या दुकानाच्या शेजारील झोपडीत नितेश राठोड हा जुगाराचा अडला चालवत असल्याबाबतची माहिती गुन्हे शाखा कक्ष तीनचे पोलीस हवालदार दिनेश जोशी यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तीन पथके तयार केली आणि त्या ठिकाणी छापा टाकला. या वेळी दोन पार्टिशन असलेल्या प्लायच्या खोल्या दिसून आल्या. त्यावेळी गोल सर्कल असलेल्या टेबलवर काही जण पत्ते खेळताना दिसून आल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक लाख १७ हजार ९७० रुपये जप्त करण्यात आले.

**दुखवटा**

## दिनानाथ पाटील


**मोहोपाडा** : रसायनी पाताळगंगा परिसरातील



वडगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सुरेश दिनानाथ पाटील यांचे वडील दिनानाथ कान्हू पाटील यांचे वृद्धत्वाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते. माळकरी असलेल्या दिनानाथ यांना धार्मिक कार्यक्रमांची आवड होती. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. दिनानाथ पाटील यांचे निधन झाल्याचे समजताच मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित राहिला. त्यांच्यावर कैरे स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २९५
www.ramprahar.com
सोमवार, १३ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरींचे खळबळजनक विधान



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सध्या सुरू असताना काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी केलेल्या एका विधानामुळे खळबळ उडाली आहे. चौधरी यांचा एक व्हिडीओ भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये चौधरी हे अदानी-अंबानी यांच्याविषयी बोलत असून त्यांनी पैसे पाठवले असते तर आम्ही गप्प बसलो असतो, असे म्हटले आहे. अधीर रंजन चौधरी हे एका यूट्यूब चॅनलला मुलाखत देत असताना केलेल्या एका विधानाचा व्हिडीओ भाजपचे अमित मालवीय यांनी एक्सवर शेअर केला आहे. यामध्ये उद्योगपतींविरुद्ध आवाज का उठवतात? यावर चौधरी म्हणाले की, ते (पैसे) पाठवत नाहीत म्हणून आम्ही बोलतो. त्यांनी ते पाठवावे. त्यानंतर आम्ही विचार करू त्यांच्या विरोधात बोलायचे की नाही. यावर ते पुढे म्हणाले, जर मला (अदानी-अंबानींचे पैसे) मिळाले असते तर आनंद झाला असता, कारण मी एक बीपीएल खासदार आहे. ज्याला मोहीम चालवण्यासाठी निधीची गरज आहे. चौधरी यांनी केलेल्या या विधानानंतर भाजपने काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे.

# आज चौथ्या टप्प्यातील मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**



लोकसभेचा महासंग्राम

देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून सोमवारी (दि. १३) चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया होणार आहे. या टप्प्यात देशातील १० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. महाराष्ट्रात ११ मतदारसंघात मतदान होईल. यासाठी राजकीय पक्षांसोबतच प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

मतदानाच्या चौथ्या टप्प्यात आंध्र प्रदेशमध्ये २५, तेलंगणा १७, उत्तर प्रदेश १३, महाराष्ट्र ११, मध्य प्रदेश व पश्चिम बंगाल प्रत्येकी आठ, बिहार व छत्तीसगड प्रत्येकी पाच, ओडिशा व झारखंड प्रत्येकी चार आणि जम्मू-काश्मीरच्या श्रीनगरमध्ये एका लोकसभा जागेसाठी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी मिळून एकूण १७१७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

महाराष्ट्रातील ज्या ११ लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदान होत आहे त्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, मावळ, अहमदनगर, पुणे, शिरुर, शिर्डी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदानासाठी निवडणूक आयोगाने स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने तयारी पूर्ण केली आहे.

राज्यात वाढते ऊन, वातावरणातील वाढलेली आर्द्रता, तर कुठे अवकाळी पावसाचा तडाखा लक्षात घेता काही विशेष काळजी घेतली जात आहे. या अनुषंगाने मतदारांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## उद्धव ठाकरेंना १९९९पासूनच मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडत होती

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गौप्यस्फोट

**मुंबई : प्रतिनिधी**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरेंबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. युतीची सत्ता आल्यानंतर १९९९पासूनच उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली होती. या निवडणूक निकालानंतर त्यांचे नाव पुढे येत नव्हते. त्यामुळे त्यांनी अपक्ष आमदारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, असा आरोप उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

उद्धव ठाकरेंबाबत सहानुभूती आहे असे जे म्हटले जाते आहे, त्यात काही तथ्य नाही. सहानुभूती काम करणाऱ्यांबाबत असते. आजवर उद्धव ठाकरेंनी काय काम केले आहे? काँग्रेसचा इतिहास तर सगळ्यांनाच माहीत आहे आणि अपेक्षेप्रमाणे निकाल लागणार नाहीत हे लक्षात आल्याने छोट्या पक्षांच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाविकास आघाडीच्या प्रयोगाबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, आम्ही वैचारिक निष्ठांना सर्वाधिक महत्त्व देतो. उद्धव ठाकरे काँग्रेसबरोबर जातील असे कधीच वाटले नव्हते. बाळासाहेबांचे चिरंजीव असे कसे काय वागू शकतात? पण आम्ही विश्वास ठेवला, आमची चूक झाली तसेच अडीच वर्षांचा शब्द आम्ही कधीही शिवसेनेला दिला नव्हता, पण त्याही पुढे जाऊन एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केले. ते शिवसेनेचे होते आणि त्यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतला. बाळासाहेबांच्या सच्च्या शिवसैनिकांना संधी द्यायचा विषय मी मांडताच मोदीजींनीही होकार दिला आणि ते मुख्यमंत्री झाले.

उद्धव ठाकरेंच्या मनात काय आहे ते आम्ही ओळखू शकलो नव्हतो. काही गोष्टी लक्षात आल्या तरीही आम्ही बाळासाहेबांच्या आदरापोटी त्यांनाही आदरच देत होतो. नारायण राणे पुन्हा मुख्यमंत्री होऊ शकले असते, पण तसे होऊ नये म्हणून रोखण्याची सगळी सोय उद्धव ठाकरे यांनी पाहिली. राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगणे चुकीचे नाही, पण उद्धव ठाकरेंना जनहितापेक्षा पद महत्त्वाचे वाटत असावे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले उदाहरणादाखल सांगतो की, मी मुख्यमंत्री असताना कोस्टल रोड हा एमएमआरडीए किंवा सिडकोच्या माध्यमातून बांधला जावा, ज्यामुळे काम वेगाने होईल असे त्यांना म्हटले होते. त्यावर उद्धव ठाकरेंनी नकार दिला आणि महापालिका ते करेल असे सांगितले. आता हे त्यांनी का सांगितले हे जनतेलाही ठाऊक आहे.

### हिंदुत्वाच्या मुद्द्यावर राज ठाकरे आमच्यासोबत

राज ठाकरे हे राजकारण्यांच्या वर्तमान पिढीतील नरेटिव्ह देऊ शकणाऱ्या नेत्यांपैकी एक आहेत. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर ते परत स्थिरावले आहेत. त्यामुळे राज ठाकरेंचे स्वागतच आहे. लोकसभेत त्यांना आम्ही जागा देऊ शकलो नाही, कारण आम्ही तीन पक्ष होतो आणि जागा ४८. विधानसभेच्या वेळी पाहू, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## कर्जतमध्ये सोसाट्याच्या वाऱ्याने घराची पडझड; दोन जण जखमी





**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सोसाट्याच्या वाऱ्यामुळे एका शेतकऱ्याच्या घराचे छप्पर उडून दोन जण जखमी झाल्याची घटना रविवारी (दि. १२) घडली. यामध्ये घराचेही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरानमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली.

हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात शनिवारी काही ठिकाणी अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. रविवारी सलग दुसऱ्या दिवशीही सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. कर्जत तालुक्यात वारा-पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान केले आहे. आंबा बागायतदारांनाही याचा फटका बसला असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली.

कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या मोरेवाडीतील किसन भाऊ केवारी यांच्या घरावरील छप्पर वादळाने उडून गेले तसेच घराच्या भिंतीही पडल्या. या घटनेत दोन जण जखमी झाले असून एक चिमुरड्याच्या डोक्याला दुखापत झाली असल्याचे सांगण्यात आले. वादळी पावसामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## जेजुरीत पॅराग्लायडिंग कोसळून तरुणी जखमी

**जेजुरी : प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे रविवारी (दि. १२) सायंकाळी पॅराग्लायडिंग एका घरावर कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघातात पुण्यातील १७ वर्षीय आस्था प्रदीप माने ही तरुणी जखमी झाली आहे.



पॅराग्लायडिंग साइटवरून उड्डाण करताच चालकाचे पॅराग्लायडरवरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. जखमी तरुणीला खाजगी रुग्णालयात दाखल केले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत, पॅराग्लायडिंग करणाऱ्या चालकाला कोणतीही दुखापत झाली नाही. पोलिसांनी घटनास्थळावर पोहचून प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## निवडक

### यापुढे निवडणूक न लढण्याची एकनाथ खडसे यांची घोषणा

**मुक्ताईनगर :** राज्याचे माजी मंत्री आणि विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे हे भाजपमध्ये घरवापसी करणार आहेत. महिनाभरापूर्वीच त्यांनी याबाबत माहिती दिली होती. लोकसभा निवडणुकीच्या कार्यक्रमामुळे त्यांचा भाजप प्रवेश रखडला आहे. दरम्यान, खडसे यांनी यापुढे निवडणूक लढवणार नसल्याचेही एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे. मी राजकारणातून निवृत्ती घेतलेली नाही. मी राजकीय माणूस आहे, पण आता निवडणूक लढवण्याकडे माझा कल नाही, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

### ज्येष्ठ मराठी अभिनेते सतीश जोशी यांचे निधन

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते सतीश जोशी यांचे निधन झाले आहे. रंगोत्सवात व्यासपीठावरच जोशी यांनी अखेरचा श्वास घेतला, अशी माहिती त्यांचे मित्र राजेश देशपांडे यांनी दिली. जोशी अनेक मालिकांमधून महाराष्ट्राच्या घराघरात पोहचले. त्यांची झी मराठी वाहिनीवरील भाग्यलक्ष्मी मालिकेतील भूमिका गाजली. त्याचप्रमाणे त्यांनी नाटके आणि सिनेमांमधूनही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.

## मावळ लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**पुणे : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी (दि. १३) सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया होणार आहे. त्यासाठी आवश्यक साहित्य वितरण करण्यात असून सर्व पथके मतदान केंद्रांकडे रवाना झाली आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली.



मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये असलेल्या सुमारे दोन हजार ५६६ मतदान केंद्रांसाठी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षक असे एकूण ११ हजार ४८४ अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत तसेच २९१ सेक्टर अधिकारीदेखील नेमण्यात आले आहेत.

विधानसभा मतदारसंघनिहाय निश्चित केलेल्या ठिकाणाहून रविवारी सकाळी ८ वाजल्यापासून मतदान साहित्य वितरण प्रक्रियेला सुरुवात झाली. प्रारंभी सर्व ठिकाणी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्र अधिकारी यांना तिसरे अंतिम प्रशिक्षण देऊन मतदान प्रक्रियेबद्दल तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांची माहिती देण्यात आली.

मावळ लोकसभा क्षेत्रातील सहा विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण २५ लाख ८५ हजार १८ मतदार असून दोन हजार ५६६ मतदान केंद्र आहेत. यासाठी आवश्यक सात हजार ६९८ बॅलेट युनिट, दोन हजार ५६६ कंट्रोल युनिट आणि दोन हजार ५६६ व्हीव्हीपॅट यंत्रे मतदान पथकनिहाय ताब्यात देण्यात आली. त्याचप्रमाणे विविध लिफाफे, स्टेशनरी, ओआरएससह प्रथमोपचारपेटी, दिशादर्शक फलक, मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक साहित्य, विविध अहवालाच्या प्रती आणि मार्गदर्शक सूचना साहित्य सुपूर्द करण्यात आले. सर्वजण साहित्यासह मतदान केंद्राकडे रवाना झाले.

### मतदारांसाठी केंद्रावर विविध सुविधा

मतदारांसाठी मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, व्हिलचेअर व्यवस्था, उन्हापासून बचाव होण्यासाठी शेड, प्रतीक्षा कक्ष तसेच प्रथमोपचार पेटीसह ओआरएस सुविधाही देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय सुविधा देण्यासाठी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## इंडिया आघाडीकडून तुष्टीकरणाचे राजकारण



### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**बराकपूर : वृत्तसंस्था**

काँग्रेसची इंडिया आघाडी तुष्टीकरणाचे राजकारण करते. येथील तृणमूल आमदाराने हिंदूंना भागीरथीमध्ये बुडवू, असे म्हटले होते. कुणाच्या जीवावर ते एवढी हिंमत करतात? यांनी बंगालमध्ये हिंदूंना द्वितीय श्रेणीचे नागरिक बनवले. तुष्टीकरणासाठी ते एससी, एसटी आणि ओबीसींना दिलेले आरक्षण हिरावून घेण्याचा प्रयत्न करताहेत, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १२) केला. ते पश्चिम बंगालमधील बराकपूर येथे सभेला संबोधित करीत होते. या वेळी त्यांनी टीएमसी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. त्याचवेळी सीएए, राम मंदिर आणि आरक्षणाबाबत राज्यातील जनतेला गॅरेंटी दिली.

संदेशखलीतील आरोपीला तृणमूल काँग्रेसने वाचवण्याचा प्रयत्न केला. टीएमसीचे गुंड संदेशखलीतील माता-बहिणींना धमकावत आहेत, कारण काय तर अत्याचार करणाऱ्याचे नाव शहाजहान शेख आहे. आज परिस्थिती अशी आहे की, बंगालमध्ये टीएमसी सरकार रामाचे नावही घेऊ देत नाही, रामनवमी साजरी करण्यास परवानगी देत नाही. काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या लोकांनीही राम मंदिराविरोधात आघाडी उघडली आहे, अशी टीकाही पंतप्रधान मोदींनी केली.

## मुरूड पर्यटकांनी फुलले



**मुरूड : प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या मुरूड व जवळील काशीद समुद्रकिनारी रविवारी मोठ्या संख्येने पर्यटक आले होते. पर्यटकांच्या गर्दीने स्थानिक व्यावसायिकांच्या चेहऱ्यावरही आनंद दिसून आला. याआधी परीक्षांचा हंगाम सुरू असल्याने लोक पर्यटनस्थळी येत नव्हते, पण मुलांना सुट्ट्या सुरू झाल्यापासून पर्यटकांची पावले कुटुंबासह पुन्हा एकदा फिरण्यासाठी वळली आहेत. त्यामुळे या ठिकाणी गजबज वाढली आहे.** (छाया : संजय करडे)

## कर्जतच्या श्री धापया महाराज आखाड्यात कुस्तीचा थरार

### हरियाणाचा संदीप चहर अजिंक्य

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव अक्षय्यतृतीयेपासून सुरू झाला. या निमित्ताने शंभरहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती हरियाणाचा संदीप चहर आणि पुण्याचा भरत लोकरे यांच्यात रंगली. यात संदीप हा भरतला चीतपट करून अजिंक्य ठरला. युवराज भगत याने तीन, तर लक्ष मढवीने चार कुस्त्या जिंकून उपस्थित कुस्तीप्रेमींची मने जिंकली.



धापया आखाड्यात सकाळी ९ वाजल्यापासून स्थानिकांमध्ये कुस्त्या होऊन लढतींना प्रारंभ झाला. कर्जत तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी ज्येष्ठ पंच मारूती ठाकरे, देवस्थानचे अध्यक्ष गणेश शिंदे, महेंद्र चंदन, मनोज वरसोलिकर, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, हेमंत पवार, अमित गुप्ता, प्रशांत पाटील, मलेश भोईर यांच्यासह कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात ५२, तर दुपारच्या सत्रात ४२ अशा एकूण ९४ कुस्त्या झाल्या. सकाळच्या सत्रात विजय ठोंबरे विजेता ठरला. त्याला रोख पारितोषिक व गदा देण्यात आली. अंतिम कुस्तीमध्ये हरियाणाचा संदीप चहर याने भरत लोकरेला मात देत बाजी मारली. या कुस्तीसाठी नितीन सावंत यांनी ११ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवले होते. याबरोबरच अन्य दानशुरांनीही रोख बक्षिसे जाहीर केल्याने या कुस्तीच्या पारितोषिकाची रक्कम १६ हजार रुपयांवर गेली. भगवान धुळे यांनी आखाडा विजेता चहर यालासुद्धा गदा देऊन गौरविले. परभणीच्या अंकुश खांडेकरने चित्तथरारक योग प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, रमेश लोभी, वासुदेव भगत यांनी काम पाहिले.

१०२ वर्षांचे कुस्ती पंच मारुती ठाकरे यांचा तसेच दत्तात्रेय पालांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. श्रीराम पाटील यांनी संपूर्ण दिवस सर्वच कुस्त्यांचे समालोचन करताना या खेळाचा इतिहास, किस्से सांगत आठवणींना उजाळा दिला. दिलीप ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. या आखाड्यात रोख पारितोषिके देण्यासाठी पप्पू गुरव, मंगेश देशमुख, अमित गुप्ता, पंकज बडेकर, योगेश देशमुख, सुवर्णा जोशी, महेंद्र चंदन, नितीन गुप्ता, अभिजित मुधोळकर, बंटी गुप्ता आदींनी सहकार्य केले.

माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, माजी नगरसेवक नितीन सावंत, निलेश घरत, मुकेश पाटील, कैलास गायकवाड, अशोक शिंदे, प्रकाश आणेकर आदींच्या हस्ते जिंकलेल्या कुस्तीगिरांना पारितोषिके देण्यात आली.

## संपादकीय

# मतदान करा, मतदान करा!

लोकसभा निवडणुकीचे तीन टप्पे पूर्ण झाले आहेत. अद्याप चार टप्पे बाकी आहेत. यापैकी चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया सोमवारी होणार आहे. आतापर्यंतची आकडेवारी पाहता मतदान सर्वसाधारण राहिले आहे. लोकशाहीप्रधान देशात प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे.

**जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतात लोकसभा निवडणूक होत आहे. देशाचे भवितव्य ठरविणाऱ्या या निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या देशाचे नेतृत्व कोण करणार याचा फैसला लोकसभा निवडणूक प्रक्रियेतून होत असतो. त्यासाठी मतदार आपला कौल मतदानाद्वारे देतात. देशात सात टप्प्यांमध्ये लोकसभा निवडणूक प्रक्रिया जाहीर करण्यात आली. त्यानुसार पहिल्या टप्प्यासाठी १९ एप्रिल, दुसऱ्या टप्प्यासाठी २६ एप्रिल आणि तिसऱ्या टप्प्यासाठी ७ मे रोजी मतदान झाले. या तीन टप्प्यांतील मतदानाची आकडेवारी पाहता सुरुवातीला कमी आणि नंतर वाढत गेल्याचे दिसून आले. वास्तविक मतदारांना मतदान करणे सुकर जावे याकरिता निवडणूक आयोग आणि प्रशासनाने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यापैकी ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांना गृहमतदानाची दिलेली सुविधा अतिशय चांगली आहे. अनेकदा शारीरिक समस्येमुळे नागरिकांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे शक्य होत आहे. अशांसाठी प्रशासनाकडून त्यांच्या घरी जाऊन मतदान करवून घेतले जात आहे, जेणेकरून ते मतदानापासून वंचित राहू नये. त्यासाठी संबंधित मतदारांनी अर्ज भरून द्यावा लागतो. एकीकडे निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले असताना उन्हाचा पाराही दिवसेंदिवस वर सरकत असल्याने प्रचंड उष्मा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांवर विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सेवा, मंडप उभारणी इत्यादीद्वारे मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना सहाय्य केले जात आहे. काही भागांमध्ये तर मतदानाची वेळ वाढवून देण्यात येत आहे. तापमानामुळे मतदानावर परिणाम होत असला तरी ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी पट्ट्यात मतदान कमी होत असते. शहरातले अनेक लोक मतदानासाठी मिळालेली सुट्टी बाहेर फिरण्यात घालवताना दिसतात, जे चुकीचे आहे, तर काही जण शिक्षण आणि रोजगारानिमित्त बाहेरगावी असल्याने त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. हे सर्व ध्यानात घेता सर्वांनी मतदान करावे यासाठी भविष्यात ई-वोटिंग संकल्पना अमलात आणावी लागणार आहे. हल्ली हजारो, लाखो रुपयांचे व्यवहार ऑनलाईन होत असतात. ती पद्धत सुरक्षित असल्याने अनेकांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे याचा गांभिर्याने विचार व्हायला हवा. खरंतर मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रशासनाकडून विविध माध्यमातून जनजागृती होत असते. तरीही अपेक्षित मतदान होत नाही. याचे एक कारण उदासिनता आहे. नागरिकांना हक्क हवे असतील, तर त्यांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडले पाहिजे. तेव्हाच त्यांना मग त्यांच्या ज्या काही मागण्यात आहेत त्यावर बोलणे उचित ठरेल; अन्यथा मतदानाकडे पाठ फिरवायची आणि फुकाच्या बाता करण्यात काय मतलब. याचबरोबर मतदारांना कुठूनही एका क्लिकवर मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली गेल्यास मतदानाच्या टक्केवारीत नक्कीच वाढ होऊन निवडणूक प्रक्रिया खऱ्या अर्थाने लोकशाहीचा महाउत्सव होईल.**

# संकटकालीन प्रभावी औषध म्हणजे आपली माणसं

उच्च शिक्षण घेण्यासाठी, नोकरीच्या शोधासाठी गाव-खेड्यातून पोर शहरामध्ये येतात. पुढे शहराची हवा पोरांना लागते. काहीजण चांगले शिक्षण घेऊन मोठ्या पदावर पोहचतात तर काहीजण मात्र शहराच्या गर्दीत कुठेतरी हरवून जातात. तेव्हा ही पोरं बऱ्याचदा वाईट मार्गाने लागलेली असतात. कारण कधी काळी हातात पुस्तके दिसणाऱ्या पोरांच्या हातात दारूच्या बॉटल्या दिसतात. एकेकाळी तासनतास वाचनालयात दिसणारी पोर पान टपरीवर सिगारेट ओढताना दिसतात. नोकरीच्या मागे धावणारी पोर कालांतराने छोकरीच्या मागे धावताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर फार मोठा बदल घडून येतो आणि पुढे त्याचा परिणाम त्यांच्या पूर्ण आयुष्यावर पडून बहुतेक पोर डिप्रेशनमध्ये जातात.

डिप्रेशनमध्ये गेलेली पोरं अनेकदा बाहेर येऊ शकत नाही. कारण त्यांच्या मनाच्या कुकरची शिटी बंद करायला कोणताही जवळचा व्यक्ती नसतो. त्यामुळे मनाच्या कुकरचा स्फोट होतो. पोरं एकटी पडतात. पुढे क्षणिक संकटासाठी पर्मनंट उपाय म्हणून आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात आणि स्वतःला संपवितात. म्हणून आपल्या मनाच्या कुकरची शिटी संकटसमयी बंद करणारा कुणीतरी आपल्या हक्काचा माणूस आपल्या आयुष्यात असावा लागतो. कारण आपल्या मनाची इंजिन बिघडली तरीही त्याची सर्व्हिसिंग करून देणारा आपल्या हक्काचा मेकॅनिकल जवळ असला की कोणत्याची कठीण रस्त्यावर प्रवास करणे अगदी सहज आणि सोपे होऊन जाते.



आजच्या वर्तमान पिढीमध्ये दिवसेंदिवस फार मोठा बदल होत झपाट्याने होत असताना दिसतो आहे. आजच्या पिढीमध्ये एकमेकांना समजून घेण्याची, नात्यांना टिकवून ठेवण्याची फारशी कुवत दिसत नाही. लहान सहान गोष्टीसाठी आजची पिढी रुसून बसते, भांडण करते पण एवढ्यातच न थांबता चांगली नातीही एका क्षणात तोडताना मागचा पुढचा कोणताही विचार करत नाही आणि पुढे आयुष्यभरासाठी एकमेकांचा विरोध करत असते. त्यामुळे आजची पिढी माणसे जोडून ठेवण्यात, नाती सांभाळण्यात फार मागे पडत आहे हे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण आजच्या तरुण पिढीमध्ये आपलेपणा सोडून एकटेपणा अधिक दिसतो आहे. म्हणून आजची पिढी संकटाचा सामना हिंमतीने करू शकत नाही.

हल्ली प्रेम विवाह मोठ्या प्रमाणात होत आहेत मात्र हातावर मोजता येईल इतकेच कुटुंब आज सुखाने आनंदाने संसार करत आहेत. कारण बहुतेक जोडपे कोर्टाच्या, पोलीस स्टेशनच्या आवारात चकरा मारताना दिसतात. म्हणजेच पूर्वी घरात होणारी मोठी-मोठी भांडणेही घरातच मिटवली जात होती मात्र आज कुटुंबात होणारी छोटी-छोटी भांडणे सुद्धा कोर्ट किंवा पोलीस स्टेशन शिवाय सुटतच नाही; किती दुर्दैव म्हणावे. आजकालची नाती अधिक काळ टिकत नाही याच्या अनेक घटना दररोज पुढे येतात. कारण आपल्या जोडीदाराला समजून घेण्याची तयारी आजच्या पिढीतील बहुतेक पोरांमध्ये नाही. म्हणून लग्न झाल्यानंतर दोन-चार महिन्यातच घटस्फोट घेण्याची वेळ कित्येकांच्या नशिबी आली आहे.

त्यामुळे आजच्या पिढीने एकटेपणा सोडून आपलेपणाची बीजे पेरावी. आपल्या सहकाऱ्यांना समजून घ्यावे. चुका सर्वांकडूनच होतात, कधी तो चुकतो तर कधी आपणही चुकत असतो. त्यामुळे चुका पदरात घेतल्या पाहिजे. कारण माणसे महत्वाची असतात चुका नाही. कधी कधी रुग्णालयातील औषधापेक्षा आपल्या माणसाचा सहवास सुद्धा आपल्याला बरा करू शकतो. त्यामुळे माणसे जोडा, त्यांना आपुलकीने, प्रेमाने जपा. कारण बऱ्याचदा आपल्याकडे सर्वच असते पण आपल्या हक्काची माणसे शोधूनही सापडत नाही. त्यामुळे आपल्या माणसांना आपल्या आयुष्यातून सहजासहजी निघून जाऊ देऊ नका. त्यांना सांभाळून ठेवा. कारण आपल्याला संकटकाळातून बाहेर काढण्याचे प्रभावी औषध हे आपली माणसेच असतात हे विसरू नका...

**-सुरज पी. दहागावकर, चंद्रपूर**


# भारतीय आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर

रविशंकर हे एक भारतीय आध्यात्मिक गुरू आहेत. त्यांचे अनुयायी त्यांना श्री श्री रविशंकर किंवा गुरुजी या नावांनी संबोधतात. त्यांना गुरुदेव असेही म्हटले जाते. १३ मे १९५६ रोजी तमिळनाडूमध्ये त्यांचा जन्म झाला. लहानपणापासून त्यांचा अध्यात्माकडे कल होता. महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय असलेले सुधाकर चतुर्वेदी हे त्यांचे पहिले गुरु आहेत.

बंगळुरु विद्यापीठातून पदवी मिळवल्यानंतर त्यांनी महाऋषी महेश योगी यांच्याकडून वैदिक विज्ञानाचे धडे गिरवले. त्यांच्या ट्रान्सेंडेंटल मेडिटेशन या संस्थेमध्ये रविशंकर यांनी काही वर्ष काम केले. १९८१ मध्ये त्यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनची स्थापना केली. २०१६ मध्ये भारत सरकारने पद्मविभूषण हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

एक मानवतावादी नेता, अध्यात्मिक गुरू आणि शांतीदूत म्हणून गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांची ख्याती जगभरात आहे.' तणावमुक्त आणि हिंसामुक्त समाज' हे त्यांचे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार होत आहे ते आर्ट ऑफ लिविंगची शिबिरे आणि सेवा प्रकल्पांद्वारा. परिणामी जगातील करोडो लोक एकत्रित शांततेने नांदत आहेत.

१९५६ साली दक्षिण भारतात जन्मलेले श्री श्री रविशंकर हे एक प्रतिभावान बालक होते. चार वर्षाचे असतानाच त्यांना श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत होती. युवा वयातच अनेकदा ते ध्यानस्थ अवस्थेत दिसून येत. त्यांचे पहिले गुरू होते सुधाकर चतुर्वेदी, ज्यांनी महात्मा गांधी



यांच्यासोबत बरीच वर्षे काम केले. त्यांच्याकडे वेद साहित्य आणि भौतिकशास्त्र अशा दोन्ही पदव्या आहेत.

श्री श्री रविशंकर हे भारताच्या कर्नाटक राज्यातील शिमोगा इथे असताना दहा दिवसांच्या मौनावस्थेत असताना त्यांना 'सुदर्शन क्रिया', एक शक्तिशाली श्वसन प्रक्रिया प्राप्त झाली. कालांतराने सुदर्शन क्रिया ही आर्ट ऑफ लिविंगच्या शिबिरांचे मुख्य गुणवैशिष्ट्य बनली.

श्री श्री रविशंकर यांनी आंतरराष्ट्रीय, नफा न कमावणारी, शैक्षणिक आणि मानवतावादी संस्था म्हणून आर्ट ऑफ लिविंगची स्थापना केली. या संस्थेचे शैक्षणिक आणि व्यक्तिमत्व-विकास कार्यक्रम हे तणाव निर्मुलनासाठी आणि निरोगी राहण्यासाठी लागणारी प्रभावी प्रक्रिया शिकवतात. केवळ एकाच प्रकारच्या जनसमुदायाला आवाहन न करता हे कार्यक्रम जगभरात आणि समाजाच्या सर्व पातळ्यांवर उपयुक्त ठरले आहेत.

१९९७ साली त्यांनी इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्युमन व्हॅल्यूज ही संस्था स्थापन केली. याचे मुख्य कारण होते ते म्हणजे दीर्घकालीन विकासाचे उपक्रम राबवणे आणि आर्ट ऑफ लिविंगबरोबर समन्वय साधून संघर्ष निवारण करणे. भारत,आफ्रिका,दक्षिण अमेरिका आणि जगभरात या दोन्ही संस्थांचे कार्यकर्ते युद्धपातळीवर दीर्घकालीन विकास कामे हाती घेत आहेत.

विविध उपक्रम आणि भाषणांतून श्री श्री रविशंकरजी हे सातत्याने मानवी मूल्यांचे प्रबलीकरण करण्यावर जोर देतात. त्यांच्या कामामुळे जगभरातील करोडो लोकांच्या जीवनात परिवर्तन घडून आले आहे. वंश, राष्ट्रीयता आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन वसुदैव कुटुंबकम स्थापित करण्याची प्रेरणा जगभर देत आहेत.' सेवाभाव आणि मानवतावादी मूल्ये जोपासल्यास आंतरिक आणि बाह्य शांती, तणावमुक्त-हिंसामुक्त समाजाची निर्मिती सहज शक्य आहे' हा संदेश त्यांनी दिला आहे.


**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅप कॉल आता आणखी सोपे होणार!

व्हॉट्सअॅपने नवीन फीचर अपडेट आणले आहे. याचे नावे ऑडिओ कॉल बार फीचर आहे. सध्या हे फिचर फक्त काही Android बीटा टेस्टर्ससाठी उपलब्ध आहे.



व्हॉट्सअॅप लवकरच आता नवे फिचर अपडेट करणार आहे. यामुळे व्हॉट्सअॅप लवकरच कॉल करण्याची पद्धत बदलू शकते. WABetaInfo च्या रिपोर्टनुसार, इन्स्टंट मेसेजिंग अॅप व्हॉट्सअॅप एक नवीन फीचर घेऊन येत आहे, ज्याचे नाव आहे ऑडिओ कॉल बार फीचर.

सध्या, फक्त काही -पवीळव बीटा परीक्षकांना हे फिचर मिळत आहे. पच्या अपडेटेड व्हर्जनमध्ये लवकरच ही सुविधा उपलब्ध होईल. या फीचरच्या मदतीने यूजरला बॅकग्राउंडमध्ये होणारे कॉल मॅनेज करणे सोपे होईल.

अहवालानुसार, या नवीन फीचरमध्ये कॉल दरम्यान टॉपवर एक नवीन बार दिसेल. या वेळेच्या मदतीने तुम्ही कॉल नियंत्रित करू शकाल. यापूर्वी, कॉल मिनिमाइझ केल्यानंतर, तो परत आणण्यासाठी वापरकर्त्याला हिरव्या स्टेटस बारवर टॅप करावे लागत होते.

पण, आता त्यात बदल करण्यात आला आहे. आता तुम्ही या नवीन बारवरून थेट कॉल म्यूट करू किंवा समाप्त करू शकाल. यासह तुम्हाला कॉल स्क्रीनवर परत जाण्याची गरज नाही.

यामुळे कॉल करणे सोपे होईल. यामुळे गोंधळ देखील कमी होईल कारण नवीन बार स्पष्टपणे काय करावे हे दर्शवते. कॉल कंट्रोल बटणेदेखील आता वरती असतील, जे पाहणे आणि वापरणे सोपे होईल.

यामुळे मल्टीटास्किंग सोपे होईल, असे या अहवालात म्हटले आहे. कॉलवर असतानाही तुम्ही व्हॉट्सपवर इतर गोष्टी करू शकाल. एकूणच, हे फिचर कॉल व्यवस्थापन सुधारेल आणि कॉल बार अधिक आधुनिक करेल.

याशिवाय व्हॉट्सअॅप काही ळजड वापरकर्त्यांसाठी कॅमेरामधील झूम कंट्रोल फीचरचीही चाचणी करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही व्हिडीओ बनवताना झूम सहज वाढवू किंवा कमी करू शकाल. हे फिचर सध्या चाचणीत आहे.

# कवी, गायक, लेखक संदीप खरे

संदीप खरे यांनी इयत्ता चौथीत असताना पहिली कविता केली. अनेक शालेय स्पर्धांमध्ये त्याने कविता आणि कथा या विषयात अनेक पारितोषिके मिळवली आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजलेल्या 'उमलते अंकुर' या कार्यक्रमात त्यांनी सादर केलेल्या कविता ही कवी म्हणून ओळख निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची घटना ठरली. आज संदीप खरे यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी...

'मौनाची भाषांतरे', 'नेणिवेची अक्षरे', 'तुझ्यावरच्या कविता' आणि 'अग्गोबाई ढग्गोबाई' या त्याच्या कवितांसग्रहांची विक्रमी विक्री झाली आहे. त्याने स्वत: स्वरबद्ध केलेल्या तसेच सलिल कुलकर्णी आणि अन्य संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या सीडीही अपार लोकप्रियता लाभली आहे.

सलग अनेक वर्षे हाऊसफुल्ल गर्दीत सुरू असलेला आणि १२०० प्रयोगांजवळ पोहचलेला 'आयुष्यावर बोलू काही' हा कार्यक्रम तर मराठी भावसंगीतामध्ये एक इतिहास घडवतो आहे. या कार्यक्रमातील गीतांसोबत संदीप करीत असलेल्या गद्य कवितांचे सादरीकरण हे देखील या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले आहे.



**निमित्त**

'मी मोर्चा काढला नाही, मी संपही केला नाही'.. 'मन तळ्यात मळ्यात जाईच्या कळ्यात'.. 'लव्हलेटर लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे लव्हलेटर असतं'.. 'दमलेल्या बाबाची ही कहाणी तुला'.. 'डिपाडी डिपांग'.. यांसारख्या कविता आणि लोकप्रिय गीतांमधून कवी संदीप खरे यांनी खरे मराठीत नाव कमवले आहे.

संदीप खरे हे 'मोबाइल अॅप'च्या माध्यमातून रसिकांच्या भेटत असतात. 'संदीप खरे'ज वर्ल्ड या अॅपद्वारे रसिकांना संदीपच्या काही कविता विनाशुल्क तर काही कविता अल्बमच्या माध्यमातून सशुल्क उपलब्ध होणार असून मोबाइल अॅपच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचणारा संदीप खरे हे मराठीतील पहिलाच कवी ठरले आहे. जगभरातील मराठी रसिकांमध्ये आणि विशेषत: युवा पिढीमध्ये संदीप खरे यांच्या कविता अत्यंत लोकप्रिय आहेत.

युवा पिढीतील लोकप्रिय गीतकार-कवी म्हणून संदीप खरे सर्वपरिचित आहेत. आपल्या रचनांवर तरुण पिढीला हजारोंच्या संख्येने झुलवण्याचे सामर्थ्य संदीप यांच्या गीतांना व कवितांना लाभले आहे. सोपी पण अर्थवाही, तसेच आजच्या पिढीच्या थेट परिचयाची भाषा आणि अभिव्यक्ती हे संदीप खरे यांच्या गीतांचे वैशिष्ट्य आहे.

संदीप खरे यांचा जन्म पुण्यात झाला. अभियांत्रिकी पदविकाधारक असलेल्या संदीप खरे यांनी महाविद्यालयीन दिवसांपासूनच आपल्या वेगळ्या कवितांनी लक्ष वेधून घेतले. मुद्रण हक्क म्हणून काम केल्यावर 'चकवा' या चित्रपटातून संदीप यांनी चित्रपट क्षेत्रात गीतकार म्हणून पदार्पण केले. 'आनंदीआनंद', 'निशाणी डावा अंगठा', 'हाय काय नाय काय', 'जमीन', 'हापूस', 'तुला शिकवीन चांगलाच धडा', 'कालचक'', 'जावईबापू झिंदाबाद', 'जनगणमन', 'मोरया', 'बदाम राणी गुलाम चोर' असे २५ चित्रपट संदीप खरे यांच्या गीतांनी सजले आहेत. संगीतकार सलील कुलकर्णी यांच्यासोबत त्याची जोडी सर्वाधिक यशस्वी ठरली आहे. तसेच त्यांनी 'ताक धिना धिन', 'वहिनीसाहेब', 'बिनधास्त', 'अशी ही माहेरची साडी', 'झेप', 'जिवलगा' या मालिकांसाठी गीतलेखन केले आहे. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : कडक ऊन आणि लोकसभा निवडणुकीमुळे एरवी गजबजणारा एसटी बस डेपो आता शांत दिसून आला.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात पेठा खाण्याचे 'हे' फायदे जाणून घ्या...

आग्र्याची प्रसिद्ध मिठाई असलेली पेठा ही कधीही आणि कुठेही सहज उपलब्ध होते. ना खराब होण्याचा त्रास ना ते साठवण्यासाठी रेफ्रिजरेटरची गरज. त्यामुळे उन्हाळ्यात पेठा जरूर खा. जेवणानंतर काहीतरी गोड खावेसे वाटत असेल तर पेठा हा एक चांगला आणि आरोग्यदायी गोड पदार्थ आहे. उन्हाळ्यात पेठा खाल्याने पोट थंड राहण्यास मदत होते.



बर्फाच्या तुकड्यासारखा दिसणारा पेठा शरीरासाठी बर्फाप्रमाणेच काम करतो. पेठामध्ये एक नाही तर अनेक औषधी गुणधर्म आढळतात. पेठा उन्हाळ्यात शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात.

पेठा खाल्याने उन्हाळ्यात पोटातील अल्सर, टाइप २ मधुमेह, जळजळ आणि इतर अनेक आजार बरे करण्यास मदत करते. पेठा पोटासाठी आणि पचनासाठीही चांगला मानला जातो.

पेठा खाण्याचे फायदे

पोट थंड ठेवते - पेठा हा थंडगार आहे. ही एक अशी भाजी आहे ज्यापासून मिठाई अगदी सहज बनवता येते. पेठा मिठाई म्हणजे रसाळ आणि कोरड्या अशा दोन्ही प्रकारच्या पेठांमुळे पोट थंड राहते. पेठा उन्हाळ्यात अवश्य खावा.

पचनसंस्था सुधारते - पेठा हा फायबरचा चांगला स्रोत आहे, त्यामुळे जेव्हा जेव्हा तुम्हाला पोटदुखी किंवा बद्धकोष्ठता, पेटके आणि सूज असेल तेव्हा तुम्ही पेठा खाऊ शकता. पेठा हालचाली नियंत्रित करते. यामुळे आतड्याचे आरोग्यही सुधारते.

लठ्ठपणा कमी करते- पेठा हे खूप कमी कॅलरी असलेले अन्न आहे, ज्यामध्ये भरपूर पोषक आणि फायबर असते. पेठाची भाजी किंवा ज्यूस रोज प्यायल्यास वजन कमी होण्यासही मदत होते, मात्र जास्त गोड पेठा खाल्ल्यानेही लठ्ठपणा वाढू शकतो.

किडनी डिटॉक्सिफाय करते- पेठा शरीरात साचलेली घाण काढून टाकण्याचे काम करतात. यामुळे किडनीमध्ये द्रवपदार्थाचा स्राव वाढण्यास मदत होते. पेठा शरीराला डिटॉक्सिफाय करून हायड्रेट ठेवण्यास मदत करते.

श्वसन प्रणाली सुधारते - पेठामध्ये असे घटक असतात जे श्वसनमार्गामध्ये जमा झालेला कफ किंवा श्लेष्मा सहजपणे बाहेर टाकतात. पेठा खाल्ल्याने श्वसनमार्ग स्वच्छ होतो. फुफ्फुस निरोगी ठेवण्यास मदत होते. ॲलर्जी झाल्यास पेठाचे सेवन फायदेशीर ठरते.

# पोलादपूरमध्ये 'अवकाळी'चा जोर

## बागायतदार शेतकऱ्यांच्या आंबा, करवंद, फणसाचे नुकसान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यामध्ये अवकाळी पावसाने पोलादपूर तालुक्याला झोडपल्यानंतर शनिवारी (दि.११) सायंकाळी पुन्हा पोलादपूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये अवकाळीचा जोर दिसून आला. यामुळे शहरात जनजीवन तात्पुरते विस्कळीत झाले. ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आंबा पीक, करवंद, फणसालाही धोका निर्माण झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत शनिवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसाने परिसराला झोडपून काढले. एसटी स्थानक परिसर, पेट्रोल पंप, अंडरपास महामार्गावरील पाच ब्रिजेस, अंडरपास महामार्ग या ठिकाणी अवकाळीच्या झडपा दिसून आल्या.

ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांचे आंबा बागायती पिक उतरविण्यात येण्यापूर्वीच अवकाळीने दोन आठवडयात सलग झोड उठविल्याने नुकसान झाले आहे. तालुक्यामध्ये आंबापिक घेणाऱ्या बागायतदार शेतकऱ्यांचे १० ते ५०० कलमी आंबा पिकदेखील या अवकाळीने धोक्यात आणले आहे. एक पिकलेले आंबा फळ गळून पडल्याखेरीज आंब्याची पेटी पिकविण्यासाठी आढी न लावलेल्या शेतकऱ्यांना या अवकाळीने मोठ्या प्रमाणात नुकसान पोहचविले आहे.

पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी आत्तापर्यंत वाशी एपीएमसी बाजारपेठेमध्ये करवंद, जांभूळ, फणसांची निर्यात केली असून या निर्यातीचे १५ दिवस अजून शिल्लक असताना गेल्या आठवड्यात आणि या शनिवारी सायंकाळी झालेल्या अवकाळीने व्यापाऱ्यांनाही नुकसान पोहचविले आहे.

दरम्यान, सोमवारपासून पोलादपूर तालुक्यात पुन्हा प्रशासन व यंत्रणा सेवेत रूजू झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनातून कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाली आहे.





# खालापुरात मतदानासाठी केंद्र सज्ज; चोख पोलीस बंदोबस्त

**चौक : प्रतिनिधी**

मतदान जनजागृतीबरोबर मतदान केंद्रेदेखील सज्ज झाली असून मतदाराला सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर कुटुंब सेल्फी पॉईंट उभा करण्यात आला आहे.

देशात एकूण सात टप्प्यात ही निवडणूक होत असून उद्या चौथ्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे आणि आता प्रत्यक्ष मतदान होण्यासाठी अनेक उपाययोजना आखल्या आहेत. मतदारांना उन्हाचा तडाखा लागू नये म्हणून मतदान केंद्राबाहेर मंडप उभारण्यात आले आहेत. बसण्यासाठी खुर्च्या ठेवण्यात आल्या आहेत. त्याच ठिकाणी थंडगार पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. दिव्यांग यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, पण त्याचबरोबर त्यांना रॅम्पने थ्रीव्हीलर सायकल असणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला असून, प्रसाधनगृहाची स्वच्छता आणि डागडुजी करण्यात आली आहे.



रविवारी दुपारपर्यंत सर्व ठिकाणी मतदान पेट्या पोहचल्या असून कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून त्यांच्या बरोबर काही ठिकाणी केंद्रिय आणि राज्य राखील पोलीस दल आहे. खालापूर तालुक्यातील १९० मतदान केंद्रावर, मतदान प्रक्रियेसाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

# वनवासी कल्याण आश्रमचे युवती चेतना शिबिर उत्साहात



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वनवासी कल्याण आश्रम यांच्या माध्यमातून जनशिक्षण संस्थान सहाण येथे युवती चेतना शिबिर रविवारी (दि.१२) घेण्यात आले. याच उपक्रमाचा भाग म्हणून जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून उपस्थित २०० वनवासी बंधू-भगिनींना विधी साक्षरता व वारली चित्रकला मार्गदर्शनदेखील करण्यात आले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया यांच्या मुख्य उपस्थितीत हा कार्यक्रम झाला, तर जनशिक्षण संस्थानचे संचालक डॉ. विजय कोकणे यांनी उपस्थितांना वारली चित्रकला विषयावर मार्गदर्शन केले. बोर्ड मेंबर अ‍ॅड. निला तुळपुळे यांनी वाटेवरती काचा गं.. या विषयावर, सहसचिव अलिबाग तालुका ड. स्वाती कुलकर्णी यांनी जनजाती समाजातील स्वातंत्र्य रणरागिणी या विषयावर, रुरल अँड यंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुशील साईकर यांनी जनजाती समाजासाठीच्या सोयीसवलती या विषयावर मार्गदर्शन केले. प्रणिता मगर व अ‍ॅड. मनिषा नागावकर यांनी विद्यार्थ्यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या माध्यमातून कायदेशीर नियमांबाबत माहिती दिली. प्रास्ताविक जिल्हा सहसचिव लतिका दातार, सूत्रसंचालन अ‍ॅड. पल्लवी तुळपुळे यांनी केले.

पाहुण्यांचा परिचय व स्वागत हितरक्षा समिती अलिबाग अ‍ॅड. रोशनी ठाकूर यांनी केले. कोकण प्रांत महिला आयाम प्रमुख ज्योती पाटील यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# नेरळ परिसरात गडगडाटासह पाऊस; जनजीवन विस्कळीत

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरळ आणि नेरळच्या परिसरात रविवारी (दि.१२) संध्याकाळी ६ वा. च्या सुमारास गडगटासह धुवाँधार पाऊस पडला. या पावसाने वीट उत्पादकांचे नुकसान झाले तर पावसापुर्वीची घरांची डागडुजी करणाऱ्यांची त्रेधा उडाली.

नेरळ परिसरातील नेरळ, कोल्हारे, वाकस भागात सायंकाळी ५.३० वा.च्या सुमारास गडगडाट सुरू झाला आणि अवघ्या काही मिनिटांत मान्सूनपूर्व पावसाने सुरुवात केली. अर्धा तास पडलेल्या पावसाने कोल्हारे गावात जाणारा रस्ता पाण्याने भरला, तसेच वीट उत्पादकांच्या कच्च्या विटांचे नुकसान झाले. रविवार असल्याने पावसापूर्वी घरांची डागडुजी करणाऱ्यांची त्रेधा उडाली, मात्र दुपारी होणाऱ्या उकाड्यापासून ग्रामस्थांची सुटका झाली.







**मुरूड : आमदार महेंद्र दळवी यांना वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी शिवसेनेचे तालुका संघटक दिनेश मिणमिणे, दिपेश वरणकर, अविनाश शिंदे, नितीन भुवड, मुरूड माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, विजय भोय उपस्थित होते.**

(छाया : संजय करडे)

# स्थलांतर केलेले आदिवासी बांधव परतले

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रसायनीलगतच्या डोंगराळ भागातील आदिवासी बांधव उन्हाळ्यात उपजीविकेचे साधन अपुरे पडत असल्याने स्थलांतरही झाले होते. त्यामुळे येथील आदिवासी वाड्या ओस पडू लागल्या होत्या, मात्र आता उन्हाळी भाजीपाल्याचा हंगाम संपत आल्याने पुन्हा आदिवासी बांधव आपल्या वाड्यांकडे परतू लागले आहेत.

रसायनी परिसरात सिंचनाचा आधार असलेले शेतकरी दुबार भात आणि भाजीपाल्याचे पीक घेतात. लगतच्या माणिकगड, कर्नाळा किल्ल्याच्या डोंगर भागातील आदिवासी वाड्यांतील उन्हाळ्यात उपजीविकेचे साधन अपुरे पडत असल्याने आदिवासी बांधव वाड्या सोडून स्थलांतरित झाले होते. माडभवन, गायचरणी, तुळशीमाळ, मोदीमाळ, निफाडवाडी, खराबाचीवाडी, दोरेवाडी, पोसरीवाडी आदी वाड्यांतील अनेक आदिवासी कुटुंब स्थलांतरित झाले होते. रसायनी पाताळगंगा परिसरात नदी, धरण, विहिर आदी प्रकारच्या सिंचनाचा आधार असल्याने अनेक आदिवासी बांधवांनी शेतकऱ्यांची जमीन भाड्याने घेऊन त्यामध्ये उन्हाळी भाज्यांचे पीक घेतले. यामध्ये काकडी, शिराळी, घोसाळी, भेंडी यांचे मोठ्या प्रमाणावर पीक घेण्यात आले, तर पनवेल, वासांबे, मोहोपाडा बाजारपेठेत भाज्यांची विक्री करतात. दरम्यान, सध्या उन्हाळी भाज्यांचा हंगाम संपत आला असल्याने आदिवासी बांधव चार-पाच महिन्यांनंतर घरी परतू लागले आहेत, तर मोहोपाडा बाजारपेठेत परिसरातील भाज्यांची आवक कमी झाली.

# घाऊक बाजारात नवीन ज्वारी दाखल

## दर प्रतिकिलो ५० ते ६० रुपयांवर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आजमितीला संतुलित आहारात ज्वारीचा समावेश होत असल्याने ज्वारीला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ज्वारीची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. एपीएमसीत आता नवीन ज्वारीचे उत्पादन दाखल होत असल्याने घाऊक बाजारात ज्वारीची प्रतिकिलो ५०-६० रुपयांनी विक्री होत आहे.

बाजारात शुक्रवारी १६४५ क्विंटल दाखल झाली असून चांगल्या प्रतीची ज्वारी ५०-६० रुपयांवर विक्री होत आहे. ज्वारी आवाक्यात आल्याने ग्राहकांना दिलासा मिळत आहे, मात्र मध्यंतरीच्या पावसाने ज्वारीचे नुकसान झाल्याने ३० ते ४० टक्के उत्पादनाला फटका बसला होता. बाजारात ज्वारीची आवक घटल्याने १३ टक्के दरवाढ झाली होती. ज्वारीचा दर प्रतिकिलोला ८० रुपये झाला होता. सोलापूर, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून ज्वारीची आवक होते, मात्र सध्या बाजारात सोलापूर येथील आवक होत आहे. फेब्रुवारीमध्ये नवीन ज्वारीचे उत्पादन घेतले जाते. त्यानंतर एपीएमसीत नवीन ज्वारी दाखल होण्यास सुरुवात होते.



**मागील वर्षी अवकाळी पावसाने ज्वारीच्या उत्पादनाला फटका बसला होता. त्यामुळे उत्पादनात घट झाल्याने ज्वारीच्या दराने उच्चांक गाठला होता, मात्र आता बाजारात नवीन ज्वारी दाखवण्यास सुरुवात झाली असून दर आवाक्यात आले आहेत.**

**-हर्षद देढिया, व्यापारी, धान्य बाजार, एपीएमसी**


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | नोड व संचिका क्र. | भूसंपादन गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर) | मंजूर पात्रता (चौ.मी) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | उलवे ९२ | उलवे ७ | ७३/६अ<br>७६/५<br>७८/२ब<br>८१/४<br>८१/५ब<br>८१/५ड<br>८२/३/१<br>८२/५<br>८१/५अ<br>८२/३(३)१<br>९२/१ | ०-१७-७<br>०-०४-०<br>०-०८-०<br>०-०४-०<br>०-०४-१<br>०-०४-८<br>०-३४-०<br>०-०६-३<br>०-०६-५<br>०-३८-९<br>०-३४-० | एकुण मंजुर १९०० चौ.मी पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ३७, सेक्टर-१५A, क्षेत्र-२९९.०४ चौ.मी. | कै. ताराबाई रामनाथ पाटील (मयत) यांचे वारस<br>**१. श्रीमती सावित्री गणपत पाटील व**<br>**२. श्रीमती मंदिरा उर्फ मंदिराबाई बबन ठाकुर** | रे.मु.क्र. २२६/२००८ |
| | | सोनखार ५ | २१/५ | ०-५६-७ | | | | |
| | | | **एकुण** | **२-१९-०** | | | | |
| २ | उलवे २९२ | बंबावी ५३ | १८/५ब<br>१९/३ | ०-३३-४<br>०-२३-३ | ८०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ९२, सेक्टर-२१, क्षेत्र-७९९.४०६ चौ.मी. | **कै. रामचंद्र त्रिंबक गायकवाड (मयत)** यांचे प्रोबेट सर्टिफिकेट ५४८/२०२१ नुसार वारस<br>श्री. नरेश जगन्नाथ गायकवाड | - |
| | | उलवे १९७ | ८४/८ | ०-१०-० | | | | |
| | | उलवे ४२ | ११३/५अ | ०-२३-८ | | | | |
| | | | **एकुण** | **०-९०-५** | | | | |
| ३ | उलवे १३८७ | गव्हाण ५८४ | १४३/१+२अ/३ | ०-२३-८ | ५०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील इरादित भूखंड क्र. ३५२, सेक्टर-१९, क्षेत्र-४९९.६७ चौ.मी. | श्री. दत्ता उर्फ दत्तात्रेय चाया घरत | - |
| | | गव्हाण २०० | ७६/३<br>६०/९ | ०-१५-४<br>०-१७-२ | | | | |
| | | | **एकुण** | **०-५६-४** | | | | |
| ४ | उलवे १५२१ | वहाळ ३५४ | १४/४ | ०-१३-० | ४०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ५२, सेक्टर-५, क्षेत्र-३९९.५५ चौ.मी. | **कै. नुनीबाई नामदेव दापोलकर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. सखाराम नामदेव दापोलकर,<br>२) श्री. यशवंत नामदेव दापोलकर<br>३) श्री. धावजी नामदेव दापोलकर | - |
| | | वहाळ ३५४ | ५०१/२<br>५१५/३<br>४८५/५ | ०-०५-०<br>०-०४-०<br>०-०७-० | | | | |
| | | पाडेघर ४६ | ४२क/४<br>१ब/५ | ०-१२-६<br>०-०६-६ | | | | |
| | | | **एकुण** | **०-४८-२** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०१७/२०२४-२५

# नवी मुंबईत होताहेत डेब्रिजचे डोंगर

## शहरातील पर्यावरणास धोका



**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील सर्वच्या सर्व महानगरपालिका क्षेत्रात उत्तप्न होणार घनकचरा व डेब्रिज नियोजन करण्याची जबाबदारी ही त्यात्या महापालिका प्रशासनाची असते, परंतु नवी मुंबई शहराच्या अंतर्गत येणाऱ्या डोंगर भागात मुंबई सारख्या भागातून नित्यनियमीत हजारो वाहने डेब्रिज टाकत असल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे. त्यामुळे नवी मुंबईत डेब्रिजचे डोंगर तयार होत असून आधुनिक शहराला डेब्रिजचे ग्रहण लागले आहे.

गेल्या काही वर्षांपासून भूमाफिया यांनी नवी मुंबई शहरातील डोंगर पोखरून अक्षरशः निसर्गाचे सौंदर्य लुटल्याचे दिसून येत आहे. भारत माता की जय ज्या देशात मातील माता समजले जाते ज्या देशात मातीसाठी जगावे कसे आणि मारावे कसे हे शुरवीरांनी शिकवले त्याच भारत देशात नैसर्गिक साधन संपत्तीचे विद्रुपीकरण चालू आहे. इतकेच नव्हे तर ज्या ठिकाणी डोंगर पोखरून मोठमोठे खड्डे पाडण्यात आले. त्याच ठिकाणी आता कोणतीही परवानगी नसताना डेब्रिज आणून टाकण्याचे काम चालु आहे.

भारत हा देश विकसनशील देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जातो. अत्याधुनिक तंत्रज्ञान नव-नवीन उद्योग, व्यवसाय होतकरू तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. जगात भारत हा सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश ठरला आहे. अश्या नवीन भारत देशात नवी मुंबईसारखे उत्तम नियोजत शहर १९८०च्या दशकात उदयास आले आहे. वाढती लोकसंख्या व नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन शासनाने अत्याधुनिक सेवा सुविधा पुरवीत या शहराची निर्मिती केली आहे. अश्या नवी मुंबई शहराच्या लगत कल्याण शिळफाटा ते बेलापूर अशी भली मोठी डोंगररांग पसरली आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून नवी मुंबई शहरातील नैसर्गिक साधन संपत्ती (मानवास उपयुक्त असणारे नैसर्गिक घटक) डोंगर, नद्या, वनस्पती, प्राणी यांचा कायापालट झाल्याचे दिसून येत आहे. वास्तविकता हजारो वाहने डेब्रिज टाकले जात असल्यामुळे नैसर्गिकरीत्या डोंगरावरून पावसाचे पाणी वाहून नेणारे प्रवाहही रोखण्यात आले आहेत. परिणामी पावसाळ्यात सदर डेब्रिज/मलबा नजिक असलेल्या मानवी वस्त्या,घरांवर घसरून मोठी जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे.

नेरूळ, शिरवणे, तुर्भे, पावना एमआयडीसी यासारख्या मोठ्या डोंगराळ भागात शासनाची कोणतीच परवानगी नसताना ही सर्व वाहने प्रशासनातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या अभय मिळवून निसर्गासहित मनुष्य जीवितास मोठी हानी निर्माण करीत आहेत. एरवी पर्यावरण विभाग मोठ-मोठ्या घोषणा देत कोट्यवधींचा निधी खर्च करीत असते, परंतु भूमाफियाच्या मार्फत ज्या देशात मातीला माता समजतात त्याचा देशात मातीशी गद्दारी करणाऱ्यांना अभय देत असल्याचे दिसून येत आहे.

### उपाययोजनांची गरज

*नवी मुंबई पालिकेने डेब्रिज भरारी पथके तयार केली आहेत, मात्र ही पथके आदृष्यपणे आपले काम करत असल्याचे दिसून येते. त्याचा फायदा अनेकदा डेब्रिज माफिया घेत असून, खुशाल ठाणे, मुंबईचे डेब्रिज शहरात रीते केले जात आहे. मुख्य म्हणजे या डेब्रिज भरारी पथकावर साटेलोटे असल्याचे आरोप होत असून, अर्थपूर्ण संबंधामुळे डेब्रिज माफियांना अभय देण्यात येत असल्याचे आरोप होत आहेत. पालिकेने शहरातील मोकळे भूखंड हेरून तसेच ठाणे बेलापूर महामार्ग, सायन पनवेल महामार्ग, एमआयडीसी मार्गालगत सीसीटिव्ही कॅमेरे लावून निरीक्षण करावे, अशी मागणी होऊ लागली आहे.*

**“ स्थानिक पातळीवर अनेक पर्यावरणप्रेमी, समाजवादी कार्यकर्त्यांनी मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी प्रशासनाला लेखी विनंत्या केल्या आहेत. नवी मुंबईतील सर्व नागरिकांच्या वतीने आपण देशाच्या सर्वोच्च राष्ट्रपती या नात्याने सदर प्रकरणात त्वरित उच्चस्तरीय समिती नेमण्यात येऊन भूमाफियाद्वारे होणारे पर्यावरणाचे नुकसान त्वरित थांबिण्यात यावे अशी विनंती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना पत्र देऊन केली आहे.**

**-निलेश कचरे, सामाजिक कार्यकर्ते, सानपाडा**

# चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रियेसाठी उरण प्रशासन सज्ज

**उरण : प्रतिनिधी**

चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रियेसाठी उरण विधानसभा मतदार संघातील संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून, या मतदानासाठी प्रशासन सज्ञ झाले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघातील १९० - उरण विधानसभा मतदार संघात संपूर्ण उरण तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गट व उरण नगर परिषद तर पनवेल तालुक्यातील गव्हाण व वडघर दोन जिल्हा परिषद गट आणि खालापूर तालुक्यातील चौक आणि वासंबे दोन जिल्हा परिषद गट आणि एक नगरपरिषद क्षेत्रात एकूण ३४४ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत.

या उरण विधानसभा मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर चार मतदान अधिकारी, एक शिपाई अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, प्रत्येक मतदान केंद्रावर एका पोलीस कर्मचाऱ्यांचीही नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ३३ - मावळ लोकसभा मतदार संघातील १९० - उरण विधानसभा मतदार संघातील एकूण - ३४४ मतदान केंद्रापैकी एकही मतदान केंद्र संवेदनशील नसून कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी नवी मुंबई पोलीस उपायुक्त परिमंडळ - २,पनवेलचे उपायुक्त विवेक पानसरे यांच्या आधिपत्याखाली उरण विधासभा मतदार संघातील संबंधित पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील पोलीस अधिकारी त्यांच्या पोलीस कर्मचाऱ्यांसह ताफ्याची गस्त सज्ञ ठेवण्यात आली आहे.

त्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत होईल, असा आशावाद १९० - उरण विधानसभा मतदार संघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जनार्दन कासार व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा उरणचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांनी व्यक्त केला आहे.

# खारघरमध्ये विवाहितेची आत्महत्या; पतीविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीने आत्महत्या केल्याप्रकरणी पतीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बेरिया, उत्तर प्रदेश येथील अर्चना सिंह यांचे लग्न २०१४ मध्ये अमोद प्रकाश सिंह यांच्यासोबत झाले. २०१८ पासून अर्चना सिंह ही तिचे पती आणि दोन मुलांसह खारघर येथे राहत आहे.

आमोद प्रकाश हे पैशांसाठी अर्चना सिंह हिला मानसिक त्रास देऊन सतत शिवीगाळ व मारहाण करत असल्याची तक्रार तिने तिच्या भावाकडे केली होती. व माहेरून पैसे आणण्यास सांगत होते. वेगवेगळ्या कारणांवरून अमोद प्रकाश सिंह हे अर्चना सिंह हिला मानसिक त्रास देत होते. तिने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले. या वेळी तिला आर्थिक नुकसान झाल्यामुळे पुन्हा तिच्यासोबत भांडण करून आर्थिक नुकसान भरून देण्यासाठी दबाव टाकत होते. व पैसे न दिल्यास सोडून देण्याची धमकी देत होते. तीन मे रोजी अर्चना सिंह हिने पती अमोद प्रकाश सिंह यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली.

या प्रकरणी १० मे रोजी अमोद प्रकाश ब्रिजराज सिंह (वय ३७) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात कलम ३६६, ३२३, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेला ‘रोटरी’ची मदत

**पनवेल : वार्ताहर**

आजच्या मातृदिनाचे औचित्य साधून येथील श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेला रोटरी क्लब ऑफ पनवेलने त्यांच्या अभिनव उपक्रमाला हातभार लावण्याच्या सजग हेतूने वीस लाखांची भरघोस मदत केली आहे. क्लबचे अध्यक्ष राजेंद्र मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या सहकाऱ्यांनी श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे विश्वस्त नितीन मुनोथ यांच्यासह अन्य विश्वस्त मंडळींना धनादेश सुपूर्द केला.




या वेळी माजी नगरसेवक राजू सोनी, सतीश पावशे, श्याम जहागीरदार, संजीवनी मालवणकर, संतोष आंबवणे, यतीश सादराणि, संगीता कामाठी, आदींचे सह रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सदस्य तथा श्री. पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे विश्वस्त तथा कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेच्या वतीने येथे दुग्ध उत्पन्न न देणाऱ्या ९५ गाईंची सेवा केली जाते. शेतकऱ्यांना उत्पन्न न देणाऱ्या जनावरांना शक्यतो ते कत्तलखान्यामध्ये विकतात. संस्थेच्या वतीने अशी जनावरे प्राप्त करून त्यांची सेवा केली जाते. तसेचआजारी जनावरांची शुश्रुषा केली जाते. कुठलेही उत्पन्न नसल्यामुळे संस्थेला हे सजग कार्य करण्यासाठी समाज बांधवांकडून येणाऱ्या देणगी वर अवलंबून राहावे लागते. अशा प्रकारच्या जनावरांचा ओघ वाढता असल्यामुळे संस्थेला आता असलेली जागा अपुरी पडत आहे. येथे अतिरिक्त शेड बांधणे, जनावरांसाठी कायमस्वरूपी दवाखाना उभारणे, जनावरांचे गाई, बैल, आजारी जनावरे असे वर्गीकरण करण्यासाठी विविध शेड्स, त्यांचा चारा ठेवण्यासाठी एक भक्कम जागा अशी कामे भविष्यात करायची आहेत. तूर्तास संस्थेला दर महिना अडीच लाख इतका खर्च येतो आहे. भविष्यातील उपक्रम करण्यासाठी देखील अतिरिक्त पैशांची गरज संस्थेला आहे.

या साऱ्या पार्श्वभूमीवर श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेला रोटरी क्लब ऑफ पनवेल ने वीस लाख रुपयांची मदत केल्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. श्री. पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे कार्याची ओळख झाल्यानंतर उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे आपापल्या परीने देणगी जाहीर करत संस्थेचे मनोबल वाढविले.

# वाशीतील भाजी मंडईत प्रचार

## आमदार मंदा म्हात्रेंनी साधला विक्रेत्यांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचाराच्या अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी वाशी येथील मिनी शिशोर येथे सकाळी मोर्निंग वॉक करण्याकरिता येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक तसेच वाशी भाजी मंडई येथील व्यापारांशी संवाद साधला. नरेश म्हस्के यांनी केलेल्या विकास कामांचा अहवाल देऊन प्रचार करत येणाऱ्या २० तारखेला आपला अमुल्य वेळ देत मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजवावा व धनुष्यबाणा समोरील बटण दाबून पुन्हा नरेंद्र मोदीजी यांना पंतप्रधान बनविण्याचे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले.



आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी सर्वांनी महायुतीच्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने निवडून देऊ या व पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे हात बळकट करू या असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी ज्येष्ठ नागरिक व उपस्थितांना केली व सर्वांच्या आरोग्याबाबत शुभेच्छा दिल्या.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत पाशाभाई, विक्रम पराजुली, विकास सोरटे, रामकृष्ण अय्यर, प्रताप भोसकर, कुलदीप केदारे, विशाल साबळे, राजाराम आचार्य, अनिल पाटील, पौर्णिमा देवडिगा, भोजा देवडिगा, जगदीश शेट्टी, ओमकार चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य, असंख्य ज्येष्ठ नागरिक व भाजी व्यापारीवर्ग उपस्थित होते.

# अभिषेक काळे यांच्या सुरेल स्वरांनी पनवेलकर रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरुपाक्ष मंदिराचा २१ वा वर्धापन दिन अतिशय उत्साहात साजरा झाला. सुप्रसिद्ध युवा गायक अभिषेक काळे यांनी आपल्या स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. अभिषेक काळे म्हणजे गायक नट असल्याने त्यांच्या गायकीचा एक वेगळाच ठसा पनवेलकर रसिकांच्या मनात उमटवला.

मैफिलीची सुरवात राग पुरीया धनाश्री या अतिशय गोड रागाने केली आणि उत्तम वातावरण निर्मिती केली. मध्यंतरानंतर जोहार मायबाप, अनादी मी अनंत मी, स्वामी समर्थ नामाचा अशी बहारदार पदे सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. शेवटी परब्रह्म भेटीलागी, कैवल्याच्या व आगा वैकुंठीच्या राया या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली आणि एक सदैव स्मरणात राहील अशी मैफिल पनवेलकर रसिकांनी अनुभवली अस म्हणायला हरकत नाही.

मैफिलीस साथसंगत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तबला वादक रामकृष्ण करंबेळकर, हार्मोनियम मालू गावकर, ऑर्गन अथर्व देव, पखवाज सुरज गोंधळी, तालवाद्य समीर कर्वे. यांनी केली आणि या सर्वांनी सुद्धा वादनासाठी विशेष वाहवा मिळवली. सर्वेश गोखले यांनी उत्तम ध्वनीव्यवस्था पाहिली. गोविंद यांनी उत्तम फोटोग्राफी केली.

विरुपाक्ष देवस्थाचे गुरुनाथ लोंढे, महेंद्र गोडबोले व सहकारी यांनी उत्तम प्रकारे नियोजन केले. कार्यक्रम संयोजनचा भाग किरण बापट यांनी सांभाळला. अविनाश देव, चंद्रकांत ताम्हनकर, अंबादास देशमुख, चंद्रकांत मने व आदित्य उपाध्ये हे सूर निरागस हो सदस्य आवर्जून कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्व उत्तम रसिक, जाणकार श्रोता यामुळे कार्यक्रम एक वेगळ्या उंचीवर गेला यात शंका नाही.



# आज मावळ लोकसभा मतदारसंघात मतदान

**पनवेल : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात या वेळी दोन्ही शिवसेनेतच लढत होत आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून विद्यमान खासदार श्रीरंग बारणे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजोग वाघेरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या मतदारसंघातील सहापैकी भाजपचे तीन, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेचा एक आमदार आहे. शिवसेनेच्या मतांची दोन गटांत विभागणी झाल्याने बारणे यांची भिस्त भाजप, राष्ट्रवादीवर असणार आहे.

पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात शहरी, निमशहरी, ग्रामीण भाग येतो. पनवेल, उरण, कर्जत, पिंपरी, चिंचवड आणि मावळ या सहाही विधानसभा मतदारसंघांत महायुतीमधील घटक पक्षांचे आमदार आहेत. मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे महेंद्र थोरवे हे कर्जतचे एकमेव आमदार आहेत. पनवेलला प्रशांत ठाकूर, उरणचे महेश बालदी, चिंचवडला अश्विनी जगताप या भाजपच्या आमदार आहेत. मावळला सुनील शेळके, पिंपरीत अण्णा बनसोडे राष्ट्रवादीचे आमदार आहेत.

शेवटच्या आठवड्यात बारणे यांच्या प्रचारासाठी मोठे नेते मैदानात उतरल्याने महायुतीला फायदा होईल असा अंदाज लावला जात आहे. बारणे आणि वाघेरे हे दोघेही नातलग आहेत. या मतदारसंघातील २५ लाख मतदारांपैकी केवळ चिंचवड आणि पनवेल या दोन मतदारसंघांत ११ लाख ६१ हजार मतदार आहेत. हे दोन्ही मतदारसंघ शहरी असून, त्यावर भाजपचे वर्चस्व आहे. त्यामुळे निवडणुकीत दोन्ही विधानसभा मतदारसंघांतील मतदार निर्णायक ठरणार असून, मावळचा खासदार ठरविणार आहेत. मावळात पहिल्यांदाच स्थानिक उमेदवारांमध्ये लढत होत आहे. बारणे आणि वाघेरे हे दोघेही पिंपरी-चिंचवडमधील आहेत हे विशेष.

शहरात गावकी-भावकी, नात्यागोत्यांचे राजकारण चालत असून, दोघांचीही मोठी नातीगोती आहेत. त्यामुळे नात्यागोत्यांच्या मतांची विभागणी होऊ शकते. ती मते कोणाच्या पारड्यात जातात, यावर बरीच गणिते अवलंबून असतील.

# उत्तर भारतीय सेनेची बैठक उत्साहात

## शिवसेना उपनेते विजय नाहटांनी केले मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

उत्तर भारतीय सैन्यदलाच्या बेलापूर विधानसभेच्या सर्व प्रमुख हिंदी भाषिक पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या उपस्थितीत सानपाडा येथे झाली.

बैठकीत उत्तर भारतीय सेना जिल्हा संघटक कमलेश वर्मा, संपर्क संघटक प्रल्हाद, उपजिल्हा संघटक धर्मेंद्र राजभर, राम भरोष शर्मा, विशाल जैशवाल, उपशहर संघटक धनेश्वर शर्मा, रामचंद्र शर्मा, पिंकू शर्मा, पवन शर्मा, गिरधारी लाल गुप्ता, कमल शुक्ला, अजय गुप्ता, अरविंद कुमार सिन्हा, विभाग घटक, बिहारीलाल शर्मा, मदन शर्मा, पंकज कुमार गुप्ता, इश्तियाक खान, राजेश वर्मा, सतेंद्र वर्मा, राज कुमार गुप्ता, रमाकांत कामत, रफिक खान, जितेंद्र चौधरी, धर्मेंद्र सिंग, विष्णू बर्नवाल, शाखा संयोजक राशिद खान यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी विजय नाहटा यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्यासोबत विभागीय व मतदारांचे विचार समजून घेऊन प्रचाराबाबत विविध प्रकारची माहिती दिली व मोठ्या संख्येने हिंदी भाषिकांचा मेळावा घेण्यासाठी प्रेरित केले. यावर सर्व अधिकाऱ्यांचे एकमत झाले. या वेळी कमलेश वर्मा यांनी महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्यासाठी प्रत्येकाने घरोघरी जाऊन प्रचार करायचा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेले निर्णय लोकांपर्यंत पोहचवा. मोदींनी देशात केलेला विकास समजावून सांगा असे वर्मा यांनी उपस्थितांना सांगितले.



निवडक

## माथेरानमध्ये शिवजयंती उत्साहात



**माथेरान** : साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या अक्षय्य तृतीया या पवित्र दिनी तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी १० वा. श्रीराम चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संघटक मनोज खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला राष्ट्रवादीचे अध्यक्ष राजेश दळवी आणि भाजपचे अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला सेनेच्या श्रुतिका दाभेकर आणि राष्ट्रवादीच्या स्वाती कुमार यांनी पुष्पहार अर्पण केला, तर स्वातंत्र्य सैनिकांच्या स्तंभास सेनेचे आदित्य भिल्लारे आणि राष्ट्रवादीचे सागर जोशी यांनी पुष्पहार अर्पण केला. छत्रपती शिवाजी महाराज रोड येथील महाराजांच्या पुतळ्याला गौरंग वाघेला, योगेश शिंदे यांनी पुष्पहार अर्पण केला. सायंकाळी ७ वा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची आणि घोड्यावर स्वार झालेल्या मावळ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या वेळी मावळ येथील झांज पथक, दांडपट्टा खेळांचे सादर करण्यात आले.

## वाढत्या उकाड्याने शीतपेयांना मागणी

**रोहा** : दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याने रोहेकर हैराण झाले आहेत. तापमानाचा पारा वाढल्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांना मागणी वाढली आहे. यामुळे शरीराचा दाह कमी करण्यासाठी शीतपेय, ज्यूस, ताक, लस्सी याकडे नागरिकांचा कल वाढताना दिसून येत आहे. उष्णतेचा पारा ४० अंशांच्या वर गेल्याने सकाळी १० वा. पासून उन्हाचे चटके बसू लागले आहेत. शहरात कुलर खरेदीच्या संख्येत वाढ झाली आहे तसेच रसाळ फळांना मागणी वाढली आहे. दुपारी मार्केट परिसर ओस पडू लागले आहेत.

## बेदरकार चालकांवर कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.११) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १७६ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख १४ हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे. सध्या सुरू असणारा पर्यटन हंगाम आणि लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्वच शासकीय यंत्रणांनी कंबर कसली आहे. त्यामुळे वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलीस लक्ष ठेवून असल्याने चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# महाड-रायगड रस्त्याचे काम संथ गतीने

## पावसाळ्यापूर्वी पूल न झाल्यास विभागाचा संपर्क तुटणार

**महाड : प्रतिनिधी**

शिवभक्तांसह महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ले रायगडकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने करण्यात येत असल्याने पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम अपूर्ण राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, तसेच लाडवली येथील पूलदेखील जर पावसाळ्यापूर्वी झाला नाही तर किल्ले रायगडसह विभागाचा संपर्क तुटणार आहे.



किल्ले रायगडकडे जाणाऱ्या रस्त्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिल्यानंतर या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्गाला देण्यात आले होते, परंतु सुरुवातीला नेमण्यात आलेल्या ठेकेदाराने एक वर्षे काम रखडवले व सक्षम नसल्याने संबंधित ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात आला. त्यानंतर अक्षय कन्स्ट्रक्शन या कंपनीला रस्त्याचे काम देण्यात आले. महाडपासून किल्ले रायगडपर्यंत हा २५ किमीच्या रस्त्याचे काम पूर्ण होईल, असे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून देण्यात आले होते, परंतु तीन वर्षांचा कालावधी होऊनही अद्याप काम पूर्ण न झाल्याने किल्ले पर्यटकांसह स्थानिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

लाडवली येथील पुलाचे पुलाच्या कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने पावसाळ्यापूर्वी वाहतुकीला सुरू होणार नाही. त्यामुळे रायगडकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद करावी लागणार आहे. किल्ले रायगड पंचक्रोशीतील सर्व गावांच्या संपर्क तुटणार आहे.

रायगड कोंझर विभागात जाणारा एकमेव मार्ग हा लाडवली पुलावरून जात असल्याने या पुलाचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. आज रोजी पुलाचे काम ५० टक्केदेखील झाले नसल्याने २० दिवसाने सुरू होणाऱ्या पावसाळ्यामध्ये वाहतूक बंद ठेवावी लागणार आहे.

अशाच प्रकारे रस्त्याची कामेदेखील ४० ते ५० टक्के झाली असून बहुतांशी छोट्या पुलांची कामेदेखील अपूर्णच आहेत. रस्त्याच्या कामामुळे सर्वत्र मातीचे ढीग, खड्डे, अस्ताव्यस्त पडलेल्या खडीमुळे धुळीचे प्रमाण वाढले असून पावसाळ्यात होणारे चिखलातून ग्रामस्थांना प्रवास करावा लागणार आहे.

अशाचप्रकारे महाडपासून अंबडवे या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे कामदेखील रखडले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## खोपोली-खालापूर परिसरात वाऱ्यासह अवकाळी पाऊस

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवसभराच्या प्रचंड तापमान व उकाड्यानंतर शनिवारी (दि.११) खोपोली शहर व खालापूर परिसरात संध्याकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसामुळे सर्वांची धावाधाव उडाली. यामुळे परिसरात जवळपास दोन तासांहून अधिक काळ वीज खंडित करण्यात आली होती.



शनिवारी संध्याकाळी ८ वा. दरम्यान खोपोली शहर व परिसरात जोरदार वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पाऊस कोसळला. या अवकाळी पावसाने नागरिकांची प्रचंड धांदल उडाली. या अवकाळी पावसामुळे येथील बांधकाम व्यावसायिकांचे उघड्यावर ठेवण्यात आलेले सिमेंट अन्य साहित्य, येथील वीटभट्ट्या व्यावसायिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जवळपास दीड तास खोपोली परिसरात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला होता.

## विवाहित महिला दोन मुलांसह बेपत्ता

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**


अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत गोंधळपाडा येथील एक विवाहित महिलेला दोन लहान मुलांसह पळवून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. दिलेल्या तक्रारीनुसार शनिवारी (दि.११) ६:३० वा. चे सुमारास होमगार्ड ऑफिसजवळ वसंत धर्मा घरत चाळ गोंधळपाडा येथून फिर्यादी यांची पत्नी (वय ३२), मुलगा (वय १३) व मुलगी (वय ८) यांस फिर्यादी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार सुजय मगर हे करीत आहेत.

## मुरूडमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

### आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे निमित्त

**मुरूड : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भरतशेठ मित्र मंडळातर्फे शहरातील लेडी कुसुम बेगम हॉस्पिटलमध्ये रविवारी (दि.१२) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शहर प्रमुख संदीप पाटील, माजी चेअरमन महेश भगत, जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, तालुका संघटक दिनेश मिणमिणे, यशवंत पाटील, दीपेश वरणकर, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, श्रीकांत सुर्वे, समीर शिंदे, वीरेंद्र भगत, माजी नगरसेवक पप्पू भगत, दर्शन काळबेरे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, मितेश पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, तालुका उपप्रमुख मनोज कमाने, ॲड. रुपेश पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी ५८ रक्तबॉटल संकलित करण्यात आल्या, तसेच उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे यांच्याकडून लेडी कुसुम बेगम हॉस्पिटलसाठी तीन पंखेसुद्धा भेट देण्यात आले.

## खालापुरात मतदान जनजागृतीसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**चौक : प्रतिनिधी**

देशातील लोकशाही समृद्ध करून टिकवणे महत्त्वाचे आहे. यासाठी मतदान जनजागृती करण्यात येत आहे. खालापूर तालुक्यात गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सुरू मतदान जनजागृतीसह पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी उपयुक्त संदेश देण्यात येत आहे.




लोकसभा निवडणुका जाहीर असून सोमवारी (दि.१३) चौथ्या टप्प्यातील मतदान होणार आहे. त्याचप्रमाणे सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला असून त्याचे विपरीत परिणाम होऊ लागले आहेत. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर आधारित उपाययोजना करून शाश्वत जीवन पद्धती अवलंबिण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी कंबर कसली आहे. त्याच अनुषंगाने तालुक्यातील ग्रामपंचायतींनी मतदानाचा संदेश, माझी वसुंधरा यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करीत आहेत.

ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांचे ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम हे सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सेल्फी पॉईंट उभा करून संदेश देत आहेत. खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सर्व ग्रामपंचायत यांचे कौतुक केले आहे.

## माथेरानमध्ये एसटीपी प्लांटची कामे युद्धपातळीवर

### स्थानिकांमध्ये समाधान

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान करांसाठी एक अत्यावश्यक असा मलनिस्सारण प्रकल्प (एसटीपी प्लांट) मार्गी लावला जात असून संबंधित ठेकेदाराकडून आता नियोजनबद्ध कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

सुरुवातीला ठेकेदाराला या गावातील एकंदरीत भौगोलिक परिस्थितीची पूर्ण कल्पना नसल्याने नेमून दिल्याप्रमाणे



त्यांनी कामाचा सपाटा सुरू होता. मलनिस्सारण पाईपलाईन टाकताना अनेक ठिकाणी विद्युत जोडण्या, त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे भूमिगत कनेक्शन आहेत. त्या सर्व कनेक्शनला लागून ही मलनिस्सारण पाईपलाईन टाकण्यात आली होती. त्यामुळे भविष्यात काही बिघाड झाल्यास पुढील खर्चाचा बोजा नगर परिषदेला सोसावा लागणार होता. याकामी भूमिपुत्रांनी निकृष्ठ दर्जाच्या कामावर हरकत घेतली होती. याबाबत मुख्याधिकारी यांच्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ठेकेदाराने सर्व परिस्थिती जाणून घेतली. माथेरानमध्ये जवळपास ५० कोटींपेक्षाही अधिक निधी या मलनिस्सारण प्रकल्पासाठी मंजूर झाला आहे. याच माध्यमातून गावातील स्वच्छता त्याचप्रमाणे लोकांचे आरोग्य चांगले राहणार आहे.

सद्यस्थितीत ठेकेदाराकडून खोदाई झालेल्या रस्त्यावर पूर्ववत ब्लॉक लावण्यात येत असून त्यासाठी स्वतः ठेकेदार जातीने लक्ष केंद्रित करीत आहेत. त्यामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

**एसटीपी ठेकेदाराने खोदलेल्या रस्त्याची खड्डे प्रेस करून ब्लॉक लावायला घेतले आहेत. याच पद्धतीने जलद गतीने कामे करून घ्यावीत. त्यामुळे येणाऱ्या पर्यटन हंगामामध्ये पर्यटकांना व वयोवृद्ध नागरिक, घोडेवाल्यांना चालायला सोयीस्कर होईल.**

**-राकेश कोकळे, माजी अध्यक्ष, धनगर समाज**

## मतदान प्रक्रियेसाठी साहित्य पोहचले केंद्रांवर

**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.१३) होणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण झाली असून मतदान केंद्रावर ईव्हीएम मशिन व मतदानासाठी लागणारे साहित्य पोहचले असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी दिली.



मावळ लोकसभा मतदारसंघातील १८९ कर्जत विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख पाच हजार मतदार आहेत. त्यात एक लाख ५३ हजार मतदार हे पुरुष तर एक लाख ५१ हजार महिला मतदार आहेत. मतदारसंघात संपूर्ण कर्जत तालुका आणि खालापूर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट तसेच खोपोली नगर परिषद आणि खालापूर नगरपंचायत यांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी ३३९ मतदार केंद्र असून मूळ मतदार केंद्रांची संख्या ३३५ आहे, मात्र १२००पेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदार केंद्रांवर सर्व मतदारांना वेळेत मतदान करता यावे यासाठी चार मतदान केंद्र वाढविण्यात आली आहेत. त्यात कर्जत तालुक्यात दोन ठिकाणी दुर्गम मतदान केंद्र असून तुंगी आणि ढाक या ठिकाणी ही केंद्र असणार आहेत. कळकराई आणि पेठ येथील मतदान केंद्र येथील मतदारांच्या परवानगीने दुर्गम भागातून खाली पायथ्याशी आणली आहेत.

मतदारसंघात या वेळी तब्बल ३३ उमेदवार निवडणूक लढवीत असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर या वेळी तीन ईव्हीएम मशीन असणार आहेत. उन्हाचा तडाखा वाढला असल्याने मतदान केंद्रावर मशीनमध्ये बिघाड झाल्यास तत्काळ दुसरे ईव्हीएम मशीन उपलब्ध करून देता यावे यासाठी मॅक्रो निरिक्षक तैनात असतील. मतदान सुरू असताना मतदान केंद्रावर कर्मचारी वर्गावर काहिसा ताण या निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान केंद्र येथे असणार आहे.

प्रत्येक मतदान केंद्रावर सहा याप्रमाणे साधारण दोन हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर आरोग्य प्रश्न निर्माण झाल्यास मतदारांना तत्काळ सुविधा देण्याची व्यवस्था आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आशासेविकांची नियुक्ती मतदान केंद्रांवर करण्यात आली आहे, तर गावाचे पोलीस पाटील उपस्थित असणार असून ते मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांना मदत करतील.

मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कर्जत विधानसभा मतदारसंघात अतिरिक्त पोलीस फाटा तैनात करण्यात आला आहे. होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाचे कर्मचाऱ्यांकडून पोलीस तैनात ठेवण्यात येणार आहेत. मतदान साहित्य व अधिकारी कर्मचारी मतदान केंद्रावर नेण्यासाठी ५० एसटी बस, १९ मिनीबस व ३२ जीपचा वापर करण्यात आल्याचे अजित नैराळे यांनी सांगितले.

## महामार्गावर सीएनजी पंप कमी असल्याने रांगा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पेट्रोल, डिझेलच्या वाहनांना पर्याय म्हणून सीएनजीवर चालणारी वाहने अनेक कंपन्यांकडून उत्पादित करण्यात आली, मात्र सीएनजी पंपांच्या कमतरतेमुळे चालकांचे प्रचंड हाल होत आहेत.

मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू झाल्यामुळे कोकणामध्ये पर्यटकांची मोठी गर्दी आहे. या सर्व वाहनचालकांना मुंबई-गोवा महामार्गावर सीएनजीअभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रायगड आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग या दरम्यान फारच कमी सीएनजी पंप आहेत. पनवेल सोडल्यानंतर पेण, रोहा, नागोठणे, माणगाव, इंदापूर आणि पुढे थेट खेडमध्ये सीएनजी पंप उपलब्ध आहेत. नुकताच महाड आणि पोलादपूरमध्ये सीएनजी पंप सुरू करण्यात आलेला आहे. महानगर गॅसच्या माध्यमातून हे पंप सुरू झालेले आहेत. सीएनजी पंपांवर सीएनजीने भरलेल्या दिवसाला दोन ते तीन गाड्याच दाखल होत असतात. सीएनजी उपलब्ध झाल्याचे समजतात पंपाबाहेर अर्धा ते एक किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागत आहेत. रांगेत असतानाच पंपामधील सीएनजी संपल्यानंतर वाहन चालकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या आणि मुंबईकडून पुन्हा सिंधुदुर्ग, गोवा, दापोलीकडे जाणाऱ्या पर्यटकांचे मोठे हाल होत आहेत.



